आनंद सागर मंगल कार्यालय
शाकाहारी करिता
एका मंगलमय कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली. आता आनंद सागर मंगल कार्यालय येथे रात्रीच्या कार्यक्रमासाठी भव्य लॉन्स उपलब्ध.
* लग्न सोहळा * साखरपूडा * रिसेप्शन * वाढदिवस
* गेट टुगेदर * कॉन्फरन्स * सांस्कृतिक कार्यक्रम
आसना बायपास चौरस्ता, गोरक्षण, जवळ, देशमुख गॅस पंपासमोर कामठा (बु.) नांदेड
व्यवस्था: स्वागत मंडप डेकोरेटर्स, मो. 9325610507,7972904719

# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

जोशी बंधू यांचे ..!!
शंकर भट्ट मंगल कार्यालय
मंगल कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली आपल्या सेवेत..!!
(लग्न, साखरपुडा, मुंज, रिसेप्शन, वाढदिवस, बारसे, डोहाळ जेवण, स्वागत समारोह व ईतर...)
पत्ता : भगवान परशुराम चौक किनवट रोड भोकर मो. क्र. 9765983335/9960659975/9881881934/9527889927

* वर्ष ६४ वे * अंक १२२ * नांदेड * शुक्रवार, दि. ९ मे २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# अखेर युद्ध पेटले! देशातील अनेक शहरांत ब्लॅकआऊट, पाकिस्तान दणाणले

## भारताकडून इस्लामाबाद, लोहार, कराचीसह अनेक शहरांवर क्षेपणास्त्रांचे हल्ले

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** ऑपरेशन सिंदूरमुळे बिथरलेल्या पाकिस्तानने आगळीक केली असून त्याने भारतावर ड्रोन हल्ले केले. जम्मू, पठाणकोट, जैसलमेर, पंजाबमधील होशियारपूरवर पाकिस्तानने ड्रोन हल्ला केला. पाकिस्तानच्या हल्ल्यानंतर या ठिकाणी ब्लॅकआऊट करण्यात आलं असून भारताची डिफेन्स सिस्टिम सक्रिय झाली आहे. भारताने पाकिस्तानचे सर्व ड्रोन पाडल्याची माहिती समोर आली आहे. जम्मूतील विमानतळ हे पाकिस्तानचे लक्ष्य होतं अशी माहिती समोर येत आहे. पाकिस्तानच्या या हल्ल्याला भारताने लागोलाग उत्तर दिलं असून थेट इस्लामाबाद आणि लाहोरवर क्षेपणास्त्रांचा हल्ला केला आहे.







गुरुवारी रात्रीच्या वेळी भारताच्या हद्दीतील जम्मू शहरात पाकिस्तानच्या ड्रोनचा हल्ला सुरू झाला. त्यानंतर जम्मूमध्ये ब्लॅकआऊट करण्यात आले आणि सायरन वाजवून लोकांना सावध करण्यात आलं. त्यानंतर या प्रदेशाचा ताबा लष्कराने घेतला. दरम्यान, भारताची डिफेन्स सिस्टिम एस ४०० सक्रिय झाली आणि त्या माध्यमातून भारताने पाकिस्तानचे अनेक ड्रोनला हवेतच लक्ष्य केलं.

पाकिस्तानवर भारताने हल्ला केल्यानंतर आता त्या ठिकाणी अनागोंदी पसरण्याची शक्यता आहे. भारतीय आक्रमणाला पाकिस्तान तोंड देऊ शकत नाही हे आता स्पष्ट झालं आहे. त्यामुळेच पाकिस्तानी लष्कर आणि सरकार आता सामने-सामने आल्याची माहिती आहे.

दरम्यान, पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ हे बंकरमध्ये लपल्याची माहिती समोर आली आहे. भारतीय हल्ल्यापासून सुरक्षित राहण्यासाठी त्यांनी हे पाऊल उचललं आहे.

पहलगाम हल्ला करुन पाकिस्तानवर युद्धाची वेळ आणल्याची किंमत लष्कर प्रमुख असीम मुनीर याला चुकवावी लागणार आहे. असीम मुनीरला ताब्यात घेण्यात आलं असून त्याची उचलबांगडी होणार आहे. असीम मुनीरची जागा आता शमशाद मिर्झा यांची नियुक्ती होणार आहे. तसेच असीम मुनीर याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा खटला चालवण्यात येणार आहे.

पाकिस्तानच्या आगळीकतेला भारताने आता प्रत्युत्तर द्यायला सुरुवात केली असून पाकिस्तानवर हल्ला सुरू केला आहे. पाकिस्तानच्या भागात त्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्याचं चित्र आहे.

भारताचा इस्लामाबादवर हल्लापाकिस्तानने भारताच्या नागरी वस्तीवर हल्ला केल्यानंतर तो हल्ला भारताच्या एअर डिफेन्स सिस्टिमने निकामी केला. त्यानंतर आता भारताने पाकिस्तानला जशास तसं उत्तर देत आधी लाहोरवर हल्ला केला. त्यानंतर पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादला लक्ष्य करत हल्ला केला.

भारताच्या हल्ल्यानंतर इस्लामाबाद हादरले असून शहरात कानठळ्या बसणारे आवाज ऐकू येत आहेत. इस्लामाबादमध्ये मोठा धमाका झाल्याची माहितीही समोर येत आहे.

भारताने पाकिस्तानच्या अनेक शहरात हल्लाबोल केला असून पेशावर शहरात मोठा धमाका झाल्याची बातमी आहे. पेशावरमध्ये झालेल्या धमाक्यानंतर नागरिकांची तारांबळ उडाली आहे.

भारताने पाकिस्तानच्या इस्लामाबादसह लाहोर, सियालकोट सारख्या १६ शहरांवर हल्ला केला आहे. एकीकडे वायू दलाचा आणि लष्कराचा हल्ला तर दुसरीकडे नौदलानेही हल्लाबोल केला आहे. त्यामुळे पाकिस्तानमध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे.

भारताच्या प्रतिहल्ल्यानंतर पाकिस्तानच्या अनेक भागात ब्लॅकआऊट करण्यात आलं आहे. पाकव्याप्त काश्मीर पूर्ण अंधारात गेलं आहे. तसेच इस्लामाबाद, कराची आणि लाहोरमध्येही ब्लॅकआऊट करण्यात आलं आहे.

अवकाशानंतर आता समुद्रातूनही पाकिस्तानची नाकेबंदी करण्याची तयारी भारताने सुरू केली आहे. आयएनएस विक्रांतवरून पाकिस्तानमध्ये हल्ले सुरू करण्यात आले आहेत. पाकिस्तानच्या महत्त्वाच्या कराची बंदरावर आयएनएस विक्रांतवरून हल्ले करण्यात आले. कराची बंदरावर १० पेक्षा अधिक स्फोटांचे आवाज ऐकू आले आहेत. त्यामुळे कराचीमध्ये एकच गोंधळ निर्माण झाल्याचं चित्र आहे. याआधी १९७१ मध्ये भारतीय नौसेनेने कराची बंदर नेस्तनाबूत केलं होतं.-

## दिल्लीसह देशभरात कडक सुरक्षा व्यवस्था

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** 'ऑपरेशन सिंदूर' नंतर राजधानी दिल्लीसह देशभरातील सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. भारतीय सैन्याच्या 'ऑपरेशन सिंदूर' नंतर देशभरातील प्रमुख शहरांमध्ये, विमानतळांवर, रेल्वे स्थानकांसह सार्वजनिक ठिकाणी सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.

पहलगाम हल्ल्याचा बदला म्हणून भारताने बुधवारी पाकिस्तानच्या अनेक ठिकाणावर एअर स्ट्राईक केला. भारताने 'ऑपरेशन सिंदूर'च्या द्वारे ९ दहशतवादी ठिकाणांना लक्ष्य करून हवाई हल्ले केले. या कारवाईत शेकडो दहशतवादी ठार झाले असून स्वतः पंतप्रधान मोदी या ऑपेरेशनवर जवळून लक्ष ठेवून होते. पाकिस्तानला यशस्वी प्रत्युत्तर दिल्यानंतर भारताने विविध शहरांमध्ये अतिरिक्त पोलिस कर्मचारी आणि निमलष्करी दल तैनात केले आहेत.

दिल्लीमध्ये देखील ठिकठिकाणी सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे, असे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.

## भारताचा पाकवर स्ट्राईक, दोन मोठ्या धरणांचे दरवाजे उघडले, पाकिस्तानात पुराचा धोका

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारतानं चिनाब नदीवर बांधलेल्या रियासी येथील सलाल धरणाचे तीन दरवाजे उघडले. या धरणातून आतापर्यंत पाकिस्तानकडे जाणारं पाणी रोखण्यात आलं होतं. सिंधू जलकरार स्थगित केल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आलं होतं. आता पुन्हा एकदा सलाल धरणाचे दरवाजे उघडल्यानंतर पाकव्याप्त काश्मीरमध्ये पूर येण्याची शक्यता आहे.



भारतानं सलाल आणि बगलिहार धरणातून पाणी सोडल्यानं पुराचं संकट निर्माण झालं आहे. जोरदार पावसामुळं भारतानं रामबन येथील बगलिहार धरणाचा दरवाजा उघडला आहे. भारतानं हे स्पष्ट केलंय की सिंधू जल करार स्थगित झालेला आहे. त्यामुळं आता या धरणांमधून किती पाणी सोडायचं हा निर्णय भारताच्या हातात आहे. भारतानं यापूर्वी चिनाब नदीतील पाणी रोखलं होतं. आता दरवाजा उघडल्यानं पाणी पाकिस्तानात पोहोचेल.

भारतानं सलाल आणि बगलिहार धरणातून पाणी का सोडण्यात आलं याचं कारण सांगण्यात आलेलं नाही. भारतानं अचानक पाणी सोडल्यानं पाकिस्तानातील लोकांच्या अडचणी वाढू शकतात. यामुळं पाकिस्तानी नागरिक त्यांच्या सरकारला प्रश्न विचारु शकतात.

विदेश मंत्रालय आणि संरक्षण दलाकडून आज देखील पत्रकार परिषद घेण्यात आली. विदेश मंत्रालयाचे सचिव विक्रम मिसरी, विंग कमांडर व्योमिका सिंग आणि कर्नल सोफिया कुरेशी यांनी कालपासून आजपर्यंत काय घडलं याबाबत माहिती दिली.

## भारतानं पाकिस्तानचे दोन दावे अन् एक मागणी फेटाळली

**मुंबई (प्रतिनिधी)–** पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा भारतानं बदला घेतला आहे, पाकिस्तानच्या घरात घुसून दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला, पीओके आणि पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले. दरम्यान ऑपरेश सिंदूरच्या यशानंतर आज भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाची एक महत्त्वाची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी पुन्हा एकदा पाकिस्तानचा बुरखा फाडला आहे, ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानकडून करण्यात आलेले दावे भारतानं फेटाळून लावले आहेत. तसेच पाकिस्तानची मागणी देखील फेटाळून लावली आहे.

भारतानं पाकिस्तानवर एअर स्ट्राईक केला, या एअर स्ट्राईकमध्ये आमचे २६ नागरिक मारले गेले आणि ४६ जण जखमी झाले आहेत, असा दावा पाकिस्तानकडून करण्यात आला होता, तसेच आमच्या धार्मिक स्थळांना लक्ष्य करण्यात आल्याचं देखील पाकिस्तानने म्हटलं होतं. पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याची संयुक्त चौकशी करा अशी मागणी देखील पाकिस्तानने केली होती, मात्र ही मागणी आणि दावे भारतानं फेटाळून लावले आहेत.

## १३ मे रोजी मान्सून अंदमानात धडकण्याची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** यंदा मान्सून वेळेआधीच दाखल होईल, असा अंदाज नैऋत्य मान्सून वाऱ्यांबाबत वर्तवण्यात आला होता. त्यातच आता थेट मान्सूनच्या आगमनाचा मुहूर्तच जाहीर करण्यात आला आहे. हवामान विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार मान्सून १३ मे पर्यंत अंदमान निकोबार बेट समुहावर दाखल होणार आहे. भारतीय हवामान विभागाने हा अंदाज व्यक्त करत दरवर्षीच्या तुलनेत यंदा ८ ते १० दिवस आधीच आगमन होणार असल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे.

यंदाचा उकाडा प्रचंड तापदायक ठरणार असा प्राथमिक इशारा उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच हवामान विभागानं जारी केला होता. त्याचप्रमाणं गोष्टी घडत गेल्या आणि राज्यात तापमानाचा कमाल आकडा ४५ अंशांपर्यंत पोहोचला. विदर्भ, मराठवाडा इतकंच काय तर अगदी मुंबईसुद्धा उकाड्यानं होरपळून निघाली.

देशभरातील विविध राज्यसुद्धा यास अपवाद ठरली नाहीत. राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, पंजाब, दिल्लीमध्ये उकाड्यानं नागरिक हैराण झाले. मार्च- एप्रिलमध्ये तर परिस्थिती असह्य झाली आणि अनेकांनाच मे महिन्याची चिंता लागून राहिली. मात्र मे महिन्याच्या सुरुवातीलाच हवामानानं चक्क हातावर तुरी दिली आणि देशभरात कमीजास्त प्रमाणात पावसानं हजेरी लावल्याचं पाहायला मिळालं. कुठे याला मान्सूनपूर्व पावसाचं नाव मिळालं, तर कुठे अवकाळी. राहता राहिला प्रश्न मान्सूनच्या आगमनाचा तर, आता त्यासंदर्भातील तारीखच हवामान विभागानं समोर आणली आहे. सध्याच्या घडीला निकोबार बेटांवर मान्सूनच्या हालचालींना सुरुवात झाली असून, हवेचा दाब कमी झाल्याने या हालचालींना वेग आला असून सलग पन्नास दिवस चाललेल्या उष्णतेचा परिणाम झाल्याने मान्सून दहा दिवस आधीच अंदमनात दाखल होण्याची शक्यता आहे.

## भारताच्या हल्ल्यात रावळपिंडी स्टेडियम उद्ध्वस्त

**कराची (प्रतिनिधी)–** रावळपिंडी येथील क्रिकेट स्टेडियमजवळ आज भारतीय ड्रोनने हल्ला केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. बुधवारी रात्री ८ वाजता पाकिस्तान सुपर लीगमधील पेशावर झल्मी आणि कराची किंग्ज यांच्यातील सामना याच मैदानावर होणार होता. मात्र, हल्ल्यानंतर वातावरण तापले असून सामना तात्काळ रद्द करण्यात आला आहे.

पाकिस्तानातील वृत्तवाहिन्यांनी दिलेल्या माहितीनुसार, एक ड्रोन स्टेडियमजवळील झाडावर आदळला, त्यामुळे परिसरातील दुकानांच्या काचा फुटल्या आणि एक नागरिक गंभीर जखमी झाला. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. स्फोटाच्या आवाजाने परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले आणि सुरक्षा यंत्रणा तत्काळ घटनास्थळी दाखल झाल्या.

## जिल्हा परिषदेत बदल्यांचा तिसरा दिवस; आरोग्य विभागातील प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा परिषदेतील सर्वसाधारण बदल्यांच्या प्रक्रियेचा तिसरा दिवस बुधवारी यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडला. या दिवशी महिला व बालकल्याण विभाग तसेच आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात आली. ही प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत थोरात, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महिला व बालकल्याण विभागातील अंगणवाडी पर्यवेक्षिका संवर्गात एकूण ९ बदल्या करण्यात आल्या असून, त्यापैकी ६ प्रशासकीय तर ३ कर्मचाऱ्यांच्या विनंतीवरून करण्यात आल्या. आरोग्य विभागातील आरोग्य पर्यवेक्षक विनंतीवरून एक बदली झाली. आरोग्य सहायिका (एलएचव्ही) या संवर्गात प्रशासकीय ४ तर विनंतीने १ अशा ५ बदल्या झाल्या आहेत. आरोग्य विभागातील विविध संवर्गांतील बदल्यांची प्रक्रिया काही प्रमाणात पूर्ण झाली असली तरी उर्वरित प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

दरम्यान गुरूवारी ग्रामीण पाणीपुरवठा, बांधकाम विभाग आणि ग्रामपंचायत विभागातील बदल्यांची प्रक्रिया जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडणार आहे.

## लाहोरमधील अमेरिकन नागरिकांना हाय अलर्ट

### पाकिस्तान सोडण्याच्या सूचना

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पाकिस्तानच्या आगळीकतेनंतर भारताने लाहोरमधील रडार यंत्रणा उद्धवस्त करुन त्या देशाला इशारा दिला आहे. त्यामुळे पाकिस्तामध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण होऊन देशभर सायरनचा वाजवण्यास सुरुवात झाली आहे. त्याच पार्श्वभूमीवर अमेरिकेने त्यांच्या नागरिकांना आणि दूतावासातील कर्मचाऱ्यांना हाय अलर्टचे निर्देश दिले आहेत. भारत आणि पाकिस्तानच्या सीमभागात जाऊ नका, लाहोरमध्ये लपण्यासाठी सुरक्षित आश्रय शोधा, तसेच देश सोडण्यासाठी सर्व कागदपत्रं तयार ठेवा असे आदेश अमेरिकेने दिले आहेत.

पाकिस्तानमधील पंजाबच्या लाहोरमधील अमेरिकन नागरिकांसाठी अलर्ट जारी केला आहे. अमेरिकेच्या लाहोरस्थित वाणिज्यदूतावासातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना सुरक्षित स्थळी आश्रय घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अमेरिकेने त्यांच्या पाकिस्तानमधील नागरिकांना दिलेल्या या सूचनांनंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध अटळ असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

अमेरिकेच्या कर्मचाऱ्यांनी, अधिकाऱ्यांनी लाहोरमध्ये कुठेही फिरू नयेत अशा सूचना देण्यात आल्या आहेत. लाहोरच्या विमानतळाच्या आजूबाजूचा परिसर हा रिकामा केला जाऊ शकतो असंही अमेरिकेने सांगितलं आहे. पाकिस्तानमधून बाहेर पडण्यासाठी प्लॅन तयार करा, सर्व आवश्यक कागदपत्रं तयार ठेवा असंही अमेरिकेने सांगितलं आहे.

## ४० वर्षांपासून रखडलेल्या लेंडी धरणाच्या गळभरणी कामाला अखेर सुरुवात

- प्रकल्पग्रस्तांशी सुसंवाद; विरोध न होता कामास प्रारंभ
- २६ हजार हेक्टर येणार पाण्याखाली; ३० हजार शेतकऱ्यांना फायदा
- मुखेड-देगलूर तालुक्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** मागील ४० वर्षांपासून रखडलेल्या लेंडी प्रकल्पाची अखेर दि. ८ मे रोजी गळभरणी कामाला सुरुवात करण्यात आली. या लेंडी प्रकल्पात १२ गावे समाविष्ट असुन पहिल्या टप्प्यात रावणगाव, भाटापुर, हसनाळ, मारजवाडी, भिंगोली व भेंडेगाव खु. असुन दुसऱ्या टप्प्यात वळंकी, कोळनुर, भेंडेगाव बु., ईटग्याळ व मुक्रमाबाद ही गावे येतात.



यावेळी आमदार तुषार राठोड, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधिक्षक सुरज गुरव, उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, तहसिलदार राजेश जाधव, पोलीस उपविभागीय अधिकारी संकेत गोसावी, सहायक पोलीस निरीक्षक भालचंद्र तिडके, लेंडी अधिक्षक अभियंता दाभाडे व लेंडी कार्यकारी अभियंता तिडके यांच्या प्रमुख उपस्थितीत गळभरणी कामाला सुरुवात झाली.

मागील दोन महिन्यांपासून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, तहसीलदार राजेश जाधव, कार्यकारी अभियंता तिडके यांनी लेंडी प्रकल्पग्रस्तासंबंधी प्रशासन स्तरावर व गावागावात जाऊन लेंडी प्रकल्पग्रस्तांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्न करीत होते. तर काही अर्ज निकाली सुध्दा काढण्यात आले. तसेच आमदार डॉ. तुषार राठोड यांनी सरकार स्तरावर वेळोवळी पाठपुरावा करुन प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याचा प्रयत्न केल्याने प्रशासनाने अखेर दि.८ मे रोजी गळभरणीला सुरुवात केली. या गळभरणीला पुनर्वसनातील गावांचा विरोध न होता सर्वांच्या सहकार्याने लेंडी धरणाची गळभरणी केली हे विशेष. तसेच गळभरणी झाली असली तरी ज्या काही अडचणी राहिल्या असतील त्या अडचणी प्रशासन स्तरावर व गावात येऊन सोडविल्या जातील असे प्रशासनाच्यावतीने सांगण्यात आले आहे. पोलीस बंदोबस्तात काम चालू आहे. धरण क्षेत्राच्या आजूबाजूस पोलिसांचा पहारा आहे.

**प्रशासनाने ठेवला सुसंवाद**

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, मुखेडचे तहसिलदार राजेश जाधव यांनी नेहमीच प्रकल्पग्रस्तांशी सुसंवाद ठेवला. कोणतीही अडचण असल्यास थेट सोडविण्याचा प्रयत्न केला. प्रकल्पग्रस्त व अधिकारी यांच्याशी थेट संवाद होत असल्याने कोणताही विरोध न होता गळभरणी सुरुवात झाली. मागील ४० वर्षांपासून रखडलेला प्रकल्प अखेर प्रशासनाच्या सुसंवादातून सुटला असे म्हणावे लागेल.

लेंडी धरणाचे काम पुर्ण झाल्यास २६ हजार हेक्टर शेती पाण्याखाली येणार असुन ३० हजार व त्यापेक्षाही जास्त शेतकऱ्यांना याचा मोठा लाभ होणार आहे. तसेच मुखेड व देगलुर तालुक्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुध्दा मिटणार आहे.

लेंडी प्रकल्पग्रस्त सानुग्रह अनुदानाच्या नोटीसा गावात देण्यात आलेल्या आहेत. येणाऱ्या काही दिवसात प्रकल्पग्रस्तांच्या खात्यात अनुदान जमा होईल.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# आयटी क्षेत्रात नवी भरारी!

जागतिक परिस्थितीत अनिश्चितता असतानाही भारतीय माहिती तंत्रज्ञान अर्थात आयटी कंपन्यांनी आपली भरती प्रक्रिया हळूहळू पुन्हा सुरू केली आहे. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स, क्लाउड कॉम्प्युटिंग आणि सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट यांसारख्या विशेष कौशल्यांमध्ये प्रचंड मागणी निर्माण झाली आहे. या क्षेत्रातील तज्ज्ञांचा अंदाज आहे की, २०२५ मध्ये आयटी कंपन्यांमध्ये भरतीत २० टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते. भारतीय आयटी व्यावसायिकांसाठी २०२५ हे वर्ष एक दिलासादायक वळण घेणारे ठरत आहे. मागील काही वर्षांत जागतिक मंदी, एआय-संकेतीत ऑटोमेशन, तसेच खर्चकपात यामुळे आयटी क्षेत्रात भरतीस मोठा फटका बसला होता. मात्र आता या क्षेत्रात नव्याने संधी निर्माण होत असल्याचं चित्र स्पष्ट होत आहे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, इन्फोसिस आणि विप्रो या तीन मोठ्या आयटी कंपन्यांनी आर्थिक वर्ष २०२५ मध्ये एकत्रितपणे तब्बल १३,५०३ नवीन कर्मचाऱ्यांची भरती केली आहे. २०२४ मध्ये याच कंपन्यांनी एकत्रितपणे सुमारे ६४,००० कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले होते. त्यामुळे यंदाची भरती ही लक्षणीय सकारात्मक पावती मानली जात आहे. तथापि, ह्या भरतीला अजून स्फोटक किंवा गतीशील असे म्हणता येणार नाही. तरीसुद्धा, मागील वर्षीच्या तुलनेत ही वाढ एक उत्साहवर्धक संकेत आहे. हे जणू संकटानंतरचं आशेचं किरण आहे. २०२४ मध्ये अनेक अनुभवी आणि पात्र व्यावसायिकांना अचानक नोकऱ्यांमधून काढून टाकण्यात आलं होतं. त्यामुळे नव्या भरतीचा हा टप्पा त्यांच्या मनात आशा निर्माण करणारा आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक तिमाहीत अनेक कंपन्यांनी नवी कर्मचारी भरती केल्याचं नोंदवलं आहे. एकीकडे ही संख्या खूप मोठी वाटत नसली तरी मंदीच्या काळात ही एक सकारात्मक चळवळ मानावी लागेल. या भरतीसाठी प्राधान्यक्रमात असलेली कौशल्यं म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय, डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी, आणि क्लाउड तंत्रज्ञान. या सर्व क्षेत्रांमध्ये सध्या प्रचंड संधी उपलब्ध होत आहेत. या पार्श्व-भूमीवर, तज्ज्ञांचा असा अंदाज आहे की, कंपन्या यापुढे फार मोठ्या प्रमाणात भरती न करता, गरजेनुसार आणि काळजीपूर्वक निर्णय घेत राहतील. भरतीची गती सावधगतीने असली, तरी स्थिर आहे. या प्रक्रियेत नव्या कौशल्यांचा अभ्यास हा अतिशय महत्त्वाचा ठरणार आहे. केवळ जुने अनुभव पुरेसे न ठरता, बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेणं हे आजच्या काळात अनिवार्य बनलं आहे. बंगळुरू, आयटीची जुनी राजधानी, आजही सर्वोत्तम आयटी टॅलेंटचं केंद्र आहे. त्यानंतर हैदराबाद आणि दिल्ली-एनसीआर या शहरांचा क्रम लागतो. मात्र, दुसऱ्या स्तरातील शहरांमध्येही आता हळूहळू भरती सुरू झाली आहे. त्यामुळे या शहरांतील युवकांनाही त्यांच्या कौशल्यानुसार संधी मिळण्याची शक्यता आहे. अर्थातच काही कंपन्या अजूनही खर्चकपात किंवा एआयमुळे अनावश्यक नोकऱ्या अशा कारणास्तव सावध पावलं टाकत आहेत. तरीही, सर्वसामान्य चित्र पाहता असं म्हणता येईल की, भारतीय आयटी क्षेत्र पुन्हा उभारी घेऊ पाहत आहे. या मार्गात अजून अनेक अडथळे येतील, परंतु दिशा ही सकारात्मक आहे. सारांशतः, आयटी क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी २०२५ हे वर्ष नव्या सुरुवातीचं प्रतीक आहे. जे कामगार गेल्या वर्षी संधी गमावून बसले, त्यांच्या समोर आता पुन्हा एकदा उभं राहण्याची, शिकण्याची आणि पुढे जाण्याची संधी आहे. फक्त त्यासाठी लागेल ती चिकाटी, लवचिकता आणि तांत्रिक कौशल्यांची तयारी. कारण भविष्यातली प्रत्येक संधी ही तयारीवरच अवलंबून आहे.

# महाराणा प्रताप ना कभी हारे; ना अकबर कभी जीता!



मेवाडचे महाराणा प्रताप-सिंह हे नाव जगप्रसिद्ध आहे. मेवाडच्या सिंहाने अकबरासारख्या बलाढ्य बाद-शहाशी, मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी २५ वर्षे तहान-भूक विसरून लढा दिला. मेवाडचे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाला इतिहासात कुठेही तोड नाही. प्रतापसिंहाच्या तेजाने केवळ राजपुतच नव्हे तर संपूर्ण भारत प्रभावित झाला होता. त्यामुळेच प्रतापसिंहांना संपूर्ण भारतात पूज्य मानले जाते.

भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंह यांना आजही मोलाचे स्थान आहे. कारण महाराणा प्रतापयांच्या नावानेच त्या काळी मुगल घाबरत असे. त्यामुळेच भारत भूमीला महाराणा प्रतापसिंहांचा मोठा अभिमान आहे. महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० साली उत्तर दक्षिण भारतातील मेवाड येथे झाला. त्याच्या वडिलांचे नाव राणा उदयसिंह. मेवाड, बुंदेलखंड आणि सिरोही वंशातील काही राजे आपला स्वाभिमान, धर्म आणि स्वतंत्रता टिकवून ठेवण्यासाठी अकबराशी प्राणपणाने लढले. पुढे उदयसिंह मेवाडचे राजा झाले. चित्तोडच्या युद्धानंतर चार वर्षांनी दि. ३ मार्च १५७२ ला उदयसिंहांचे निधन झाले. यानंतर मेवाडची संपूर्ण सूत्रे महाराणा प्रतापसिंह यांच्याकडे आली व त्यांचा राज्याभिषेक झाला. ज्यांचे नाव घेतल्याने सर्वांनाच स्फुर्ती येते असे महान तेजस्वी योध्दा म्हणजे महाराणा प्रताप.

महाराणा प्रतापांनी प्रतिकूल परिस्थितीतही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मेवाडचे रक्षण केले. जयपूरचा राजा मानसिंग याने अकबरापासून आपल्या राज्याला धोका पोहोचू नये म्हणून आपली बहीण अकबराला देऊन सोयरिक केली. अकबराने मेवाडला आपल्या अधिपत्याखाली आणण्यासाठी मान-सिंहाला मेवाडला जाण्यास सांगितले. त्या निमित्ताने मानसिंग दिल्लीला जात असताना वाटेत मुद्दाम आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याकरिता कुंभगडावर असलेल्या महाराणा प्रतापसिंह यांच्या भेटीस गेला. महाराणा प्रताप यांनी त्यांचा आदर सत्कार केला. परंतु मानसिंहांच्या पंक्तीत बसून जेवण्यास नकार दिला. मानसिंहाने याचे कारण विचारले. यावर महाराणा प्रताप म्हणाले, ''स्वतःच्या समशेरच्या बळावर आपल्या राज्याचे रक्षण करण्याऐवजी जे राजपूत आपल्या मुली-बहिणी मोगलांना देऊन त्यांच्यापासून राज्य रक्षण करतात, अशा अस्वाभिमानी राजपुतांच्या पंक्तीला मी बसत नाही. मी जर आपणासोबत जेवण केले तर बाप्पा रावळ, राणा सांगा यांसारख्या थोर वंशाला काळीमा फासण्यासारखे होईल. हे ऐकून मानसिंहाच्या मनात खटकले आणि महाराणा प्रतापसिंह यांना धमकी देत म्हणाला, ''महाराणा प्रतापसिंहजी आज आपण माझा अपमान केला, ह्याचा बदला रणांगणात अवश्य घेईल व मानसिंह काय आहे हे दाखवून देईल.'' असे म्हणून तेथून निघून गेला आणि मानसिंह व महाराणा प्रतापसिंह यांच्यात कट्टर वैरत्व निर्माण झाले. ही घटना अती शिगेला पोहोचली व युध्दात रूपांतर झाली.राणाजींचे वक्तव्य नेहमीच मानसिंहाच्या मनाला खटकत होते.

संपूर्ण घटना मानसिंहाने अकबराला सांगितली. पहिलेच मानसिंह तिलमिला झालेला होता आणि अकबराला मेवाड पाहिजे होते.याकरीता अकबर सर्वत्र जहर घोळण्याचे काम करीत होता.अशा परिस्थितीत अकबराने मानसिंहाच्या नेतृत्वाखाली दोन लाख प्रचंड सैन्य आणि अकबराचा मुलगा सलीम याला घेऊन हल्दीघाटीच्या दिशेने महाराणा प्रताप यांच्याशी युद्ध करायला निघाला. ही बातमी महाराणा प्रतापसिंह यांना कळताच त्यांनी आपले बावीस हजार सैन्य घेऊन अरवली पर्वताच्या कुंभलगड वाटेने जाणाऱ्या मानसिंहाच्या सैन्यावर बाणांनी छुपे हल्ले करून बरेचसे सैनिक धाराशाही केले. दोन लाख सैन्याशी बावीस हजार सैन्य लढा देत होते.

महाराणा प्रतापसिंह यांच्या तलवारीचा वार अकबराचा मुलगा सलीमवर बसणार तितक्यात सलीमचा हत्ती हालला आणि तो तलवारीचा वार हत्तीवर बसला आणि सलीम वाचला. महाराणा प्रतापसिंहांच्या भीतीने मानसिंह आपल्या सैन्यासह पिछाडीवर राहिला. हे घनघोर युद्ध अनेक दिवस चालले. राणाजी आपल्या तलवारीने वेढा कापत सामोरं जाण्याचा प्रयत्न करू लागले. महाराणा प्रतापसिंह जखमी द्व झालेले पाहून मानसिंह अत्यंत दु:खी झाला. आपण कुठेतरी चुकत आहोत हे त्यांच्या लक्षात आले व मेवाडच्या रक्षणासाठी आपण येथून निघून जाण्यास विनंती केली व प्रतापसिंहानी ती मान्य केली. प्रतापांचे छत्र आणि मुकुट मानसिंहाने स्वतः डोक्यात घातले. मानसिंहाला महाराणा प्रताप-सिंह समजून मोगलांनी आक्रमण केले. अनेक मोगलांना त्यांनी ठार मारले व शेवटी विरगतीरला प्राप्त झाले. तेवढ्यातच शत्रू सैनिकांनी राणाजींचा घोडा चेतक याच्या पायावर तीर सोडून वार केला.त्याचा पाय निकामी झाला. अशाही परिस्थितीत स्वामिनिष्ठ घोड्याने वेढ्याचा भेद करून व संपूर्ण वेढा चिरत दूर निघून गेला. वाटेत एक ओढा लागला चेतकने उडी घेऊन तो ओढा पार केला आणि काही दूर जाऊन चेतकने प्राण सोडला. आपला पाठलाग कोण करीत आहे हे पहाण्यासाठी राणाप्रतापांनी मागे फिरून पाहिले, तर अकबराला जाऊन मिळालेला आपला धाकटा भाऊ शक्तीसिंह व त्यांच्या बरोबर चार-पाच मोगल सैनिकांना जिवे मारीत होता.

राणाजी हे दृश्य पाहून अचंबित झाले. यानंतर शक्तीसिंह राणाजींजवळ आले आणि त्यांना आलिंगन देऊन म्हणाला, दादा तुझ्यासारखे शौर्य आणि कणखर मन यांच्या अभावामुळे मी जरी मोगलांची सरदारकी करीत असलो तरी तूच माझा आदर्श आहे. या हल्दीघाटीच्या युद्धानंतर अकबराने महाराणा प्रतापसिंह यांच्यावर अनेक आक्रमणे केली. मात्र अकबर महाराणा प्रतापसिंह यांना पराभूत करू शकला नाही. हल्दीघाटी हे इतिहासातील सर्वात मोठे युद्ध मानल्या जाते. प्रतापांना हरविण्यासाठी शेवटचा उपाय म्हणून अकबराने पराक्रमी योद्धा जगन्नाथला मोठ्या सेनेसह १५८४ मध्ये मेवाडवर आक्रमक करण्यास पाठविले. परंतु २ वर्षे अथक प्रयत्न करूनही तो महाराणा प्रतापसिंह यांना पकडू शकला नाही किंवा हरवू शकला नाही.अशाप्रकारे प्रबळ महत्त्वाकांक्षी, दृढनिश्चयी, धैर्यशील, उज्वल कीर्तीवंत आणि साहसी अशा महाराणा प्रतापसिंहाला शमविण्याचा प्रयत्न अकबराने केला, पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.२१ जून १५७६ रोजी चेतकने (घोड्याने) महाराणा प्रतापसिंहांना निरोप दिला.

आजही हल्दीघाटी येथील राजसमंद येथे चेतकची समाधी आहे. १९ जाने-वारी १५९७ रोजी महाराणा प्रतापसिंह यांची प्राणज्योत मावळली. भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंहाचे नाव राष्ट्र, धर्म, संस्कृती, स्वाभिमान यासाठी आजही मानाने घेतले जाते. जोपर्यंत सूर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत प्रतापांचे नाव अमर राहील. परमप्रतापी महाराणा प्रतापसिंहांना जयंतीनिमित्त कोटी-कोटी प्रणाम!

**-रमेश लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९

# आधुनिक भगीरथ : कर्मवीर भाऊराव पाटील



बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पो-हचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज पुण्यतिथी. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्यामनात प्रचंड असंतोष होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते.

कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तीथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्वना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगा-वत दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते.

बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपव-ली. लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या.

१९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिव-ाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सदगुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, (२७ मुलींसाठी) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, (१ मुलींसाठी) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेचा विस्त-ार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डि. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची पुण्यतिथी. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांना विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
मो. ९९२२५४६२९५

# कमी बुद्ध्यांक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे काय?

ज्याचा बुद्ध्यांक हा अतिशय कमी आहे अशी मुलं शिक्षणात कमी पडतात. अशा मुलांना शिकवतो म्हटल्यास तारेवरची कसरत असते. अशावेळेस त्या शिक्षकांना त्या मुलांना शिकविण्यासाठी फार मेहनत घ्यावी लाग-ते. ती बुद्धीची कसरतच असते शिक्षकांची. शिक्षक मुलांसाठी अपार मेहनत करीतच असतात. पण अशी अपार मेहनत करणारी शिक्षक मंडळी काही जास्त प्रमाणात नसतात. त्यांची संख्या फार कमी असते.




शिक्षक मेहनत घेतात यात काही वावगं नाही. परंतु काही काही अशाही शाळा आहेत की ज्या शाळेत मुलांना शिकवायचे असल्यास आधी त्यांच्या आईवडीलांची पात्रता परीक्षा घेतली जाते. ती पात्रता परीक्षा पैशाची नसते. तर तो पालक किती शिकलेला आहे? त्याला इंग्रजी वाचता येतं का? तो मुलांना शिकवण्या लावू शकेल काय? यासाठी असते. शिकवण्या लावू शकेल काय? तो पालक किती शिकलेला आहे? त्याला इंग्रजी वाचता येते काय? हे प्रश्न. कशासाठी? तर आम्हाला शाळेत जास्त मेहनत घ्यावी लागू नये यासाठी. पालकांना वारंवार सांगता यावं की त्यानं आपल्या मुलांना तो शिकलेला असल्यानं शिकवावं. जर त्याला तसं शिकवता येत नसेल तर त्याच्या मुलाला काढून टाकणार शाळेतून यासाठी त्या पालकांचं शिक्षण हवं. दुसरा मुद्दा हा की, त्या पालकाला इंग्रजी यावं. कारण अलीकडे स्पर्धेचा काळ. अशा काळात जर त्या पालकाला इंग्रजीचं ज्ञान नसेल तर तो पालक आपल्या मुलांची इंग्रजी कशी काय हाताळू शकेल? हा प्रश्न शाळा प्रशासनाला पडतो. म्हणूनच ते त्या पालकाला इंग्रजी येणं पाहतात. तसाच तिसरा मुद्दा आहे, तो म्हणजे त्या पालकानं त्या मुलांची स्वतःच शिकवणी लावायची सोय उपलब्ध करावी. का? तर तो मुलगा अभ्यासात आणि शिक्षणात मागे पडू नये. हा झाला अलीकडच्या शाळेतील व्यवहार. आता शिकवणी वर्गाचं सांगतो. शिकवणी वर्गाचं सांगत असतांना मला एकदा जो फोन आला अकॅडमीकडून त्याचा उल्लेख करणं गरजेचं समजतो.

हॅलो. हं, बोला. मी अमूक अमूक अकॅडमीकडून बोलतेय. तसं अकॅडमीकडे बोलायला मुलीच असतात. कारण मुलींचा आवाज ऐकू आला की चांगली चांगली पुरुषमंडळी पिघळतात व न करणारं कार्यही करु पाहतात. म्हणून खास करुन अकॅडमीनं ग्राहक खेचण्यासाठी केलेली स्पेशल सोय. आपली मुलगी दहावीत आहे ना. होय. मग? आमची अमूक अमूक अकॅडमी आहे. शिकवणी लावायची असेल तर सांगा? तिचा प्रश्न. ते ऐकून मी तिची फिरकी घेण्यासाठी केलेलं बोलणं. सध्या नववीतच आहे. पास व्हायची आहे. पास झाल्यावर सांगेन. अहो, सगळी मुलं पासच होतात. हुशार आहे ना. नाही. हुशार नाही. त्यामुळंच तर म्हटलं की पास झाल्यावर सांगेन. अन् मला सांगा आ-तापासूनच शिकवणी का बरं लावायची? पास झाल्यावर पाहू ना. अहो, इंटरव्ह्यू घ्यावा लागतो. कोणाचा? कोणाचा म्हणजे? आ-पला. आपण किती शिकले आहात ते पाहावं लागेल की नाही. का बरं? आपली मुलगी मेरीटला आणायची असेल तर ते पाहावं ला-गेल की नाही?

हे बघा, माझी मुलगी तेवढी हुशार नाही व मिही जास्त शिकलेला नाही व माझी पत्नीही. हं, पैसे लावू शकतो मी. परंतु निकाल लागल्यावरच. चालेल का? मलाही वाटतं की माझी मुलगी मेरीटला यावी. बोला येईल का? नाही येणार. का बरं? अहो, मुलगी तेवढी हुशार पाहिजे. त्याचबरोबर तिचे मायबाप. तिचे मायबाप दहावी असून चालत नाही. ते कमीतकमी एमएससी, बीएससी तरी पाहिजेत. हो का? नाही बा. आम्ही तेवढे शिकलेलो नाही. बरं मग ठीक आहे. ही अकॅडमी तुमच्या काही कामाची नाही. म्हणजे? मी आणू नाही का पास झाल्यावर मुलीला आपल्या अकॅडमीत? नाही, मुळीच नाही. का बरं? मी त्याचं कारण विचारत असतांनाच त्या मुलीनं फोन कापला. मी थोडासा फिरकी घेण्यासाठीच बोललो. परंतु माझं ते बोलणं ऐकताच त्या मुलीला समजलं की हे पालक काही जास्त शिकलेले नाहीत व यांची मुलगीही जास्त हुशार नाही. तेव्हा यांच्या मुली-वर कोण मेहनत घेणार?

या शिकवणी वर्गातून नेहमीच घडून येणाऱ्या गोष्टी. अलीकडील मेरीट आणणाऱ्या शिकवणी वर्गात गरिबांची व कमी शिकलेल्या लोकांची मुलं दिसत नाहीत. तसंच अलीकडे मेरीट येणाऱ्या शाळेतही गरिबांची व कमी शिकलेल्या लोकांची मुलं दिसत नाहीत. परंतु मुलं मेरीटला आल्यास त्यांचंच नाव होतं. अशा शाळे-तून आणखी मुलं मेरीटला यावीत. म्हणून या मेधावी मुलांचा सत्कार केला जातो. अशा शाळांना देणग्याही दिल्या जातात. परंतु ज्या शाळेत गरिबांची मुलं आहेत. निरक्षरांची मुलं आहेत. ज्या मुलांना शिकवायचे म्हटल्यास तारेवरची कसरत आहे. अशी मुलं अशा गरिबांच्या शाळेतून कमीतकमी साठ टक्केपर्यंत जाणे म्हणजे तारेवरची कसरतच असते. त्यांचे साठ टक्के गुण म्हणजे त्यांचं मेरीटच असतं. परंतु त्यांची कोण दखल घेतं? कोणीच नाही. याबाबत मी सांगतांना एवढंच म्हणेल की एखाद्या रोपट्याला पुरेशी त्यांची वाढ होण्यासाठी पुरेसं वातावरण दिलं तर त्यांची वाढ चांगली होणार. याउलट एखादं रोपटं अवर्षणात जगत असेल तर, तर त्या रोपट्याची वाढ होईल काय? मुळातच होणार नाही किंवा एखाद्या मुलाला चांगलं खायला प्यायला, दिल्यास तो मुलगा धष्टपुष्ट दिसेल अन् नाही दिल्यास तो धष्टपुष्ट दिसेल काय? नाही दिसणार. तेच गणित असतं मेधावी मुलात. मुलांना अभ्यासासाठी पोषक वातावरण मिळालं की ती मेरीटला येणारच आणि नाही मिळालं तर ती मेरीटला येणारच नाहीत.

आज अशा बऱ्याच शाळा आणि शिकवणी वर्ग आहेत की जे पालकांचं इंग्रजीचं ज्ञान पाहतात. त्यातच ते किती शिकलेले आहेत तेही पाहतात आणि मुलगा जर अभ्यासात कमजोर आढळल्यास पालकांनाच वेठीस धरतात. शेवटी असे पालक नाईलाजानं शिकवण्या लावून देतात. सोबतच शिकवणी वर्गातील व शाळेतील अभ्यास स्वतः आपल्या पाल्यांकडून घरी करवून घेतात. मग ती मुलं मेरीटला येणार नाही तर काय? मेहनत पालकांची असते व नाव शाळेचं आणि शिकवणी वर्गाचं होतं. का अशा शाळा एखाद्या झोपडपट्टीतील गरिबांच्या मुलाला शाळेत प्रवेश देवून मेरीटला आणू शकत नाहीत? का असे शिकवणी वर्ग ग्रामीण भागातील एखाद्या गरिबाच्या मुलाला दत्तक घेवून मेरीटला आणत नाहीत? परंतु ते तसे करीत नाहीत. मुलं मेरीटला येतात. कारण त्यांना सगळं आयतं मिळतं. आयतं म्हणजे हुशार मुलं आणि हुशार पालक. तसंच श्रीमंत पालक आणि श्रीमंत मुलं. सगळं पोषक वा-तावरण.

बुद्ध्यांक कमी असलेली आणि विशेषतः ग्रामीण भागातील मुलांना चांगलं शिक्षण मिळावं यासाठी आजच्या काळात कोणी वाली नाही. त्यांनी शिकावं यासाठी शासन वेगवेगळ्या योजना राबवत असतांना दिसतं. परंतु ती मुलं शिकतील तेव्हा ना. तिही मुलं शिकू शकतात. त्यांना तसं वातावरण मिळालं तर...परंतु तसं वातावरण आजच्या शाळा व शिक्षक द्यायला तयार नाहीत. ते स्वतःच पालकांना सांगतात. शिकवणी ला-वून द्या. तेही एवढं शिकविण्याचं वेतन मिळत असतांना. अन् शिकवणी वर्गही पालकांकडून तीच अपेक्षा ठेवतात. शिकवलेलं पालकांनं पुन्हा घरी शिकवावं. जर तो पालक निर-क्षरपणानं घरी शिकवायला तयार नसल्यास अशा पालकांची मुलं शिकवण्या लावूनही मागं पडतात. ती मेरीटला येणं दूरच. ती साध्या सोप्या पद्धतीच्या असलेल्या परीक्षेतही पास होत नाही. आज मुलं कसेतरी आठवीपर्यंत तरी शिकतात. कारण मुलांना आठवीपर्यंत नापास करता येत नाही म्हणून. जर ह्याच ठिकाणी मुलांना पास होण्याची संधी नसती तर, अशी मुलं ही पहिली दुसरीच्या पुढे गे-लीच नसती. हे तेवढंच सत्य आहे. यावरून बुद्धू मुलांचा वाली कोण? हा प्रश्न निर्माण झाला आहे. बुद्धू मुलं मायबाप म्हण-तात म्हणून शाळेत येतात. कशीतरी शाळा सुटेपर्यंत बसतात. सुट्टी झाली की घरी जा-तात. दप्तर फेकतात व निव्वळ खेळतात. मायबाप जेव्हा कामावरुन घरी येतात. तेव्हा ती झोपेच्या आहारी गेलेली असतात. सकाळीही कामावर जायच्या घाईनं मायबाप त्यांचा अभ्यास करवून घेवू शकत नाहीत. अशी मुलं अभ्यासात मागे पडतात. कारण ना त्यांचा अभ्यास मायबाप करवून घेत, ना शाळेतून शिक्षक करवून घेत. मग ती अभ्यासात मागे पडणारच. शेवटी ती मुलं अशी मागे पडतात की, ती कशीबशी आठवीपर्यंत तर शिकतात आणि आठवीनंतर शाळा सोडतात. काही काही मुलं कशीतरी शालान्तपर्यंत जातात. मग ना-पास होतात. ती मुलं नापास झाली की, अगदी अल्प वयातच कामाला लागतात व जीवनभर वेठमजूर म्हणून जीवन घालवीत असतात. त्यानंतर त्यांची संततीही तशीच अल्प शिकून तिही वेठमजूरच बनतात. ही वास्तविकता आहे. त्यामुळंच बुद्ध्यांक कमी असलेल्या मुलांचा वाली कोण? हा प्रश्न युगानुयुगे पडणारच आहे. केवळ आणि केवळ शिक्षकांमुळे. शिक्षकच या बुद्धू मुलांना न्याय देवू शकतो. परंतु तो तरी काय करणार? तोही विवश आहे.

अलीकडे शासन जरी आठवीपर्यंत नापास करु नये हे धोरण राबवीत असलं तरी कामं एवढी वाढवली आहेत की शिक्षकांना ती कामं करावी लागतातच. या व्यतिरिक्त ऑनलाईन कामंही वाढवली आहेत. त्यातच शाळेत अशी ऑनलाईन कामं करायला बाबू नाही. त्यामुळंच शिक्षकांची तारांबळ उडते. ते सतत ऑनलाईन कामात व्यस्त असतात. मग अशावेळेस विद्यार्थ्यांच्या शिकवण्याकडे दुर्लक्ष होते व ज्यातून बुद्धू मुलांचं नुकसान होत असतं. हेही तेवढंच खरं आहे. त्यामुळंच सरकारनं यावर उपाय म्हणून ज्या ठिकाणाहून देशाचं भवितव्य घडतं. त्या प्रत्येक शाळेत ऑनलाईन कामं करण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या हितासाठी एकतरी बाबू द्यावा. म्हणजे बुद्धू विद्यार्थ्यांचीही गळचेपी होणार नाही व शिक्षकांनाही मुलं का शिकवली नाही म्हणून बहाणा सापडणार नाही. तेही चांगले विद्यार्थी घडवतील. विद्यार्थ्यांवर चांगली मेहनत घेतील नव्हे तर त्यानंतर बुद्धू मुलंही शाळेत दिसणार नाही. तसेच कोणत्याही विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना पालकांचा इंटरव्ह्यू घेवून प्रवेश नसावा. तसे आढळल्यास अशा शाळेवर कार्यवाहीची सोय असावी. जेणेकरुन चांगल्या शाळेतही बुद्धू मुलांना शिकता येईल. प्रत्येक शाळेत केवळ आणि केवळ हुशारच विद्यार्थ्यांचाच विचार होवू नये तर बुद्धू विद्यार्थ्यांचाही विचार व्हावा हे तेवढंच खरं. मग कोणावरही बुद्धू विद्यार्थ्यांचा वाली कोण? हे म्हणण्याची वेळ येणार नाही व कोणताच बुद्धू विद्यार्थीही दिसणार नाही. अन् दिसलाच तर ते शिक्षक कार्यवाहीस पात्र असतील यात शंका नाही.

**अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

## थोडक्यात...

### ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी कंधार व मुखेड येथे वसतीगृह सुरु

**नांदेड (प्रतिनिधी)–** सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता पाचवी ते पदवी, पदवीव्युत्तर अभ्यासक्रमासाठी वसतिगृह प्रवेश ऑफलाईन अर्ज वाटप करण्यास सुरवात झाली आहे. इच्छुक विद्यार्थी व पालकांनी संबंधित गृहपालांशी संपर्क साधून ऑफलाईन अर्ज प्राप्त करुन घ्यावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय १० जानेवारी २०२४ अन्वये ऊसतोड कामगारांच्या मुलां- मुलींसाठी नांदेड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील ६२ संत भगवान बाबा मुलांचे शासकीय वसतीगृह सुरु करणेबाबत मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार नांदेड जिल्ह्यातील कंधार व मुखेड या दोन तालुक्यातील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता पाचवी ते पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी १०० मुलांच्या क्षमतेची वसतीगृह सुरु करण्यात आली आहेत.

### उपसाधने पुरवठा योजनेच्या अर्जदारांची आज निवड

**नांदेड (प्रतिनिधी)–** अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचतगटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करणे या योजनेतंर्गत पात्र झालेल्या बचत गटाची संख्या उपलब्ध तरतुदीच्या अनुषंगाने अर्जदारांची संख्या जास्त आहे. त्यामुळे लाभार्थ्यांची निवड लॉटरी पद्धतीने आज दि. ९ मे २०२५ रोजी सकाळी १० वा. नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे करण्यात येणार आहे. संबंधितांनी या निवडीसाठी उपस्थित रहावे, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्याबाबतची योजना शासनाने सुरु केली आहे.

# नांदेड शहरात लवकरच महावितरणचे नवीन पाच सबस्टेशन सुरू होणार

## अतिरिक्त विजेचा वापर ग्राहकांनी थांबवावा –अधीक्षक अभियंता जाधव

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** विजेची मागणी, तसेच वाढते तापमान यामुळे वीजपुरवठा करण्यास व्यत्यत येत आहे. वीज ग्राहकांनी महावितरण कंपनीची अडचण ओळखून अतिरिक्त वीज वापर थांबवावा, जेणेकरून विजेचा पुरवठा करण्यास सुलभता येईल. यासोबतच शहराची विजेची मागणी लक्षात घेता नव्याने पाच नवीन सब स्टेशन मंजूर झाले असून त्यांच्या कामाच्या निविदाही संबंधित कंत्राटदाराला देण्यात आल्या आहेत. लवकरच हे नवीन सब स्टेशन नांदेड शहराच्या सेवेसाठी सज्ज होणार असल्याचे अधीक्षक अभियंता सुधाकर जाधव यांनी 'दैनिक गोदातीर समाचार'शी बोलताना सांगितले.

नांदेड शहराची लोकसंख्या लक्षात घेता सध्या १४ सबस्टेशन व त्यातून होणारा वीजपुरवठा कमी पडत आहे. त्यातच मागील दहा ते पंधरा दिवसांपासून वीज ग्राहकांच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी वाढल्या. कारण विजेचा लपंडाव सातत्याने सुरू आहे. हे नाकारता येत नसले तरी त्यात सुधारणा करून वीज ग्राहकांना तात्काळ सेवा देण्यासाठी महावितरण सातत्याने प्रयत्न करत आहे.

एप्रिल महिन्यामध्ये अचानक तापमान वाढल्याने विजेची मागणी वाढली. रोहित्र अतिभारीत झाल्याने इन्स्ट्रप्शन्स होत आहेत. यासोबतच ट्रान्सपोर्ट तापमानामुळे भ्रष्ट होत आहेत. त्यासाठी आम्ही कुलिंग करण्यासाठी कुलरचा वापर सुरू केला आहे. अति महत्त्वाच्या ठिकाणी ट्रान्सपोर्टला कुलरद्वारे आम्ही कुलिंग करत असल्याचे जाधव यांनी सांगितले. काही ठिकाणी ओव्हरलोड असलेल्या ट्रान्सपोर्टची लाईन दुसऱ्या फिडरवर जोडण्यात आली. जास्तीत जास्त प्रमाणात नागरिकांना, वीज ग्राहकांना वीजपुरवठा सुरळीत व्हावा यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत असल्याचे जाधव यांनी सांगितले.

मार्च महिन्याच्या शेवटी वसुली मोठ्या प्रमाणात सुरू होती. त्यामुळे देखभाल व दुरुस्तीच्या कामाकडे दुर्लक्ष झाले हे नाकारता येत नाही, परंतु अचानक लोड वाढल्याने महावितरणची वीजपुरवठा करणारी यंत्रणा कमी पडत आहे. त्यातच वादळी वाऱ्यामुळे तारा तुटणे, खांब वाकणे आदी नैसर्गिक आपत्तीचाही सामना करावा लागत आहे.

शहरातील विजेची मागणी लक्षात घेता नव्याने पाच नवीन सब स्टेशन लवकरच उभारण्यात येणार आहेत. त्यासाठी निविदा संबंधित कंत्राटदाराला देण्यात आली आहे. यामुळे येणाऱ्या काळात नक्कीच भार नियमन कमी होईल, असा विश्वास जाधव यांनी व्यक्त केला. वीज ग्राहकांनीही अतिरिक्त विजेचा वापर करू नये. वीज चोरी आणि वीज गळती यामुळेही महावितरण कंपनीला मोठा तोटा सहन करावा लागत आहे. नागरिकांनी वीज चोरी करू नये, वरज बिल नियमित भरावे असे आवाहनही जाधव यांनी केले आहे.

## खून प्रकरणातील फरार आरोपी एलसीबीच्या जाळ्यात, खंजरसह अन्य मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** खुनाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर फरार असलेल्या आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. त्याच्याकडून एक खंजर व अन्य मुद्देमाल जप्त करून नांदेड ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात दिला आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन 'फ्लश आऊट'अंतर्गत पाहिजे, फरारी आरोपींचा शोध घेवून कायदेशीर कारवाई करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना आदेशीत केले होते. त्यावरून पोलीस निरीक्षक खंडेराय यांनी सहायक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे व त्यांच्या पथकातील अंमलदार यांना वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेशीत केले होते.

त्यावरून दि. ८ मे रोजी सहायक पोलीस निरीक्षक वाव्हुळे व त्यांच्या पथकातील अंमलदार यांना पो.स्टे. नांदेड ग्रा.गु.र.नं. ३०२/२०२५ कलम ३०२, ३०७, १४३, १४७, १४८, १४९ भादंवि गुन्हयातील एक वर्षापासून फरार असलेला आरोपी महम्मद शहबाज मोहम्मद हारून हा तुप्पा पाटी येथे येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यावरून सदर ठिकाणी सापळा लावला. आरोपी मोहम्मद शहबाज मोहम्मद हारून वय २७ वर्ष, व्यवसाय बेकार रा. मगदुमनगर मस्जिदजवळ, विनकर कॉलनी नांदेड हा तुप्पा पाटी येथे आला असता त्यास ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून एक खंजर जप्त करण्यात आली. सदर आरोपीस विश्वासात घेऊन अधिक विचारपूस केली असता सदर आरोपीने पोलीस स्टेशन उस्माननगर हद्यीत मोबाईल टॉवरच्या बॅटऱ्या चोरी केल्याचे सांगितले. तसेच सदर आरोपी हा त्याचे साथीदारांसह सन २०२४ मध्ये उत्तर प्रदेश येथे दरोडा टाकून फरार झाला होता. आरोपीस ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कारवाईसाठी पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

एक वर्षापासून खुनाच्या गुन्हयात तसेच उत्तर प्रदेश येथे दरोडयाच्या गुन्हयात फरार असलेल्या आरोपीस ताब्यात घेऊन टॉवर बॅटऱ्या चोरीचा गुन्हा उघडकीस आणणारे अधिकारी व अंमलदार यांचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांनी कौतुक केले आहे.

## अल्पवयीन बालिकेवर अत्याचार करणाऱ्यास वीस वर्षांची शिक्षा; कंधार जिल्हा न्यायालयाचा निकाल



**नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील सोनखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या चार वर्षीय बालिकेला चॉकलेटचे आमिष दाखवून आपल्या घरात बोलावून अत्याचार करणाऱ्या नराधमाला कंधार येथील जिल्हा न्यायाधीशांनी २० वर्ष सक्तमजुरी व ६ हजार रुपये रोख दंड, दंड न भरल्यास ११ महिने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

दि.११ एप्रिल २०२२ रोजी एक चार वर्षीय बालिका आपल्या गावात उमराच्या झाडाखाली आपल्या लहान भावासोबत खेळत असताना नरबा कांबळे नावाच्या माणसाने तिला चॉकलेटचे आमिष दाखवून आपल्या घरी नेले. तिच्यावर अत्याचार तर केलाच केला. पण तिला मारहाण सुध्दा केली. या प्रकरणाची तक्रार बालिकेच्या वडिलांनी सोनखेड पोलीस ठाण्यात दिल्यानंतर पोक्सो कायद्यानुसार गुन्हा क्रमांक ६३/२०२२ दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरिक्षक रुपाली कांबळे यांच्याकडे देण्यात आला.

रुपाली कांबळे यांनी बालिकेवर अत्याचार करणारा नराधम नरबा कांबळे यास अटक केली आणि तपास पूर्ण करून कंधार न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. कंधार न्यायालयात हा विशेष सत्र खटला क्रमांक २४/२०२२ पहिले जिल्हा न्यायाधीश कंधार यांच्याकडे चालला. या प्रकरणात ११ साक्षीदारांनी आपले जबाब न्यायालयासमक्ष नोंदवले.

न्यायालयासमोर आलेला वैद्यकीय पुरावा, इतर साक्षीद आणि सरकारी वकील ॲड. शैलजा पाटील यांनी मांडले युक्तीवाद ग्राह्य धरुन कंधारचे पहिले जिल्हा न्यायाधीश नरबा कांबळेला २० वर्ष सक्तमजुरी आणि ६ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

## पैनगंगा नदीतिरावरील महादेव मंदिरात चोरी



**किनवट (प्रतिनिधी)–** शहराजवळून वाहणाऱ्या पैनगंगा नदीतिरावरील महादेव मंदिराचे सभागृह फोडून अज्ञात चोरट्यांनी रोख रकमेसह ५० हजारांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना गुरुवार, दि. ८ मे रोजी पहाटे उघडकीस आली.

पैनगंगा नदीतिरावरील महादेव मंदिरात दररोज सकाळ, सायंकाळ भाविक येतात. बुधवार, दि. ७ मे रोजी रात्रीच्या आरतीनंतर रोजच्याप्रमाणे मंदिर बंद करण्यात आले. मध्यरात्री ते पहाटेच्यादरम्यान अज्ञात चोरट्यांनी मंदिराच्या सभागृहाच्या चॅनल गेटचे कुलूप तोडले. सभागृहातील महागडे एम्प्लीफायर, माईकसेट, सीसीटीव्ही कॅमेरे, भांडे आदी वस्तू चोरट्यांनी लंपास केल्या. सभागृहातच असलेली दानपेटीही चोरट्यांनी फोडून आतील रकमेसह दान दिलेल्या चांदीच्या वस्तुही लंपास केल्या. गुरुवारी सकाळी मंदिर उघडताच चोरी झाल्याची बाब निदर्शनास आली. याप्रकरणी मंदिर समितीचे अध्यक्ष शिवकुमार भंडारे यांनी पोलिसांत तक्रार दिली. त्यावरून अज्ञात चोरट्यांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## भूखंड प्रकरणी १२ जणांविरुद्ध वजिराबाद ठाण्यात गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील सोमेश कॉलनीमधील एका भूखंड प्रकरणी मनसे जिल्हाध्यक्ष मॉन्टीसिंघ जहागिरदार यांच्यासह १२ जणांविरुध्द वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिपीका दीपकराव पाठक यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्यांच्या घरात व मालकीच्या जागेत तोडफोड करून सीसीटीव्ही फुटेज तोडू द्या, असे म्हणत काही जणांनी त्यांना ६ मे २०२५ रोजी जिवे मारण्याची धमकी दिली. या जागेचा वाद न्यायालयात सुरू असून दीपक पाठक आणि त्यांचे चुलत बंधू प्रभाकर पाठक यांनी न्यायालयात संयुक्त पूरसीस देवून जैसे थे परिस्थिती राहावी असे न्यायालयास सांगितले असताना सुध्दा हा प्रकार घडल्याचे तक्रारीत म्हटले आहे. माझ्या घरात ६ मे रोजी मॉन्टीसिंघ जहागिरदार, प्रभाकर सखारामपंत पाठक व इतर अनोळखी १० ते १५ जण माझ्या घरात तोडफोड करण्याचा प्रयत्न करत होते. मला व माझ्या परिवाराला संपविण्याची धमकी देत होते. माझी मुले कामानिमित्त बाहेरगावी राहतात. घरी मी व माझे पतीच असतो अशा आशयाची ही तक्रार आहे. या तक्रारीवरुन वजिराबाद पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरिक्षक पवार यांच्याकडे देण्यात आला आहे.

## बारावीच्या निकालात एकलव्य कॉलेजचे सुयश



**नांदेड (प्रतिनिधी)–** अर्धापूर तालुक्यामध्ये आपली ओळख निर्माण करणारी एकमेव इंग्लिश शाळा एकलव्य इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, शेलगाव रोड बामणी येथील बारावीच्या विद्यार्थ्यांनी परीक्षेत पुन्हा एकदा गगनभरारी घेतली असून शाळेचा क्रॉप सायन्सचा निकाल १०० टक्के लागला आहे.

विद्यार्थी आणि शिक्षकांनी घेतलेल्या मेहनतीचे फळ या निकालात दिसून येत असल्याचे प्रतिपादन संस्थेच्या अध्यक्षा सौ. सविता मारोतराव कंठेवाड यांनी केले. शाळेच्या सचिव डॉ. श्रद्धा कंठेवाड यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या मेहनतीचे फळ मिळाले आहे, असे मत व्यक्त केले आहे.

शितले अंकिता ८५.६७ टक्के घेऊन कॉलेजमधून सर्वप्रथम आली आहे. जाधव संस्कृती ८२.८३ टक्के, सय्यद हाजी अरमान ७९.१७ टक्के, माने साक्षी ७३.५ टक्के, वाडपल्लू श्रेयानिता ६७.८३ टक्के, मोहम्मद तमीम ६२.१७ टक्के, मगर बालाजी ६०.१७ टक्के गुण मिळविले आहेत. तसेच अनेक विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले आहे.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक तथा उद्योजक मारोतराव कंठेवाड, संस्थेच्या अध्यक्षा सौ. सविता कंठेवाड, संस्थेचे सर्व संचालक, शाळेचे प्राचार्य रविंद्र, उपप्राचार्य डॉ. सुनील काळे, शाळेचे जनसंपर्क अधिकारी प्रा. भास्कर पाईकराव व शाळेतील सर्व शिक्षक आणि कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## आज मूर्तीची प्राणप्रतिष्ठा; शेतकऱ्यांनी स्वखर्चातून मंदिर उभारले

**माहूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील वाई बाजार येथील प्रगतशील शेतकरी गणरायावर प्रचंड श्रद्धा आहे. या श्रद्धेतून त्यांनी आपल्या शेतात गणरायाचे मंदिर उभारले आहे. या मंदिरासाठी प्रशांत शिंदे यांनी गावातील कुणाकडूनही एक रुपया देणगी घेतली नाही. त्यांनी स्व:कष्टातून जमवलेल्या पैशातून हे मंदिर उभारले आहे. या मंदिरात त्यांनी गणरायासह पिंड आणि नंदीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा आज दि.९ मे रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे.

प्रशांत यांची भगवान गणरायावर नितांत श्रद्धा आहे. या श्रद्धेतून त्यांनी स्वत:च्या शेतात गणरायाचे मंदिर उभारण्याचा संकल्प केला. हा संकल्प तडीस नेण्यासाठी त्यांनी मागील एक वर्षापूर्वी शेतात मंदिराच्या बांधकामाला सुरुवात केली. गावातील अनेक भाविकांनी मंदिर उभारत असल्यामुळे त्यांना मदत करण्यासाठी हात पुढे केले. मात्र, प्रशांत यांनी कुणाकडूनही मदत न घेता मंदिर उभारले. गेल्या दोन वर्षांत शेतातून मिळालेल्या उत्पन्नातून त्यांनी या मंदिराचे बांधकाम केले. या मंदिराचे काम नुकतेच पूर्ण झाले असून दि.९ मे रोजी सकाळी ९ वाजता या मंदिरात भगवान गणरायासह पिंड आणि नंदीच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा होणार आहे. पंचक्रोशीतील भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन देखील प्रशांत शिदे यांनी केले आहे.

## हज यात्रेकरूंसाठी अतिरिक्त रेल्वे कोच उपलब्ध करून द्या

### काँग्रेसच्या शिष्टमंडळांचे डीआरएम यांना निवेदन



**नांदेड (प्रतिनिधी)–** सध्या भारतातील विविध विमानतळांवरून हज यात्रेकरूंचे प्रस्थान सुरू आहे. या वर्षी, नांदेडहून अंदाजे ९०० हज यात्रेकरू रवाना होत आहेत. २६ मे रोजी मुंबईहून सर्वात जास्त संख्येने हज यात्रेकरू रवाना होणार आहेत. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने नांदेड रेल्वे व्यवस्थापकांची भेट घेतली. नांदेडचे खासदार रविंद्र चव्हाण यांचे एक निवेदन सादर केले, ज्यामध्ये २३, २४ आणि २५ मे रोजी नांदेडहून सुटणाऱ्या नंदीग्राम, देवगिरी आणि राज्यराणी एक्सप्रेस गाड्यांमध्ये किमान दोन अतिरिक्त स्लीपर कोच जोडण्याची मागणी करण्यात आली.

नांदेडमधील हज यात्रेकरू आणि त्यांच्यासोबत मुंबईला जाणारे त्यांचे नातेवाईक यांनी आरक्षण केले आहे, परंतु तिकिटे प्रतीक्षा यादीत आहेत. त्यामुळे रेल्वे विभागाकडे मागणी करण्यात आली की, अतिरिक्त कोचची व्यवस्था करून नांदेडमधील सर्व हज यात्रेकरूंचे आरक्षण निश्चित करावे. त्याचबरोबर हज यात्रेकरूंच्या प्रस्थानानिमित्त नांदेड रेल्वे स्थानकावर अतिरिक्त पोलिस बंदोबस्त ठेवण्यात यावा. शिष्टमंडळात काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष शमीम अब्दुल्ला, माजी उपमहापौर अब्दुल गफ्फार, काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष रहीम अहमद खान, शहराध्यक्ष अब्दुल अजीज कुरेशी, काँग्रेस जिल्हा कार्याध्यक्ष विठ्ठल पावडे, सुरेश हटकर, पक्षाचे प्रवक्ते मुंतजीब, माजी नगरसेवक सय्यद शोएब हुसेन, अब्दुल हबीब बागबान, फिरोज, मुहम्मद जुबेर अहमद आदींचा समावेश होता.

## लोह्यातील श्री संत गाडगे महाराज ज्युनिअर कॉलेजच्या कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**लोहा (प्रतिनिधी)–** प्रतिवर्षी प्रमाणे याहीवर्षी लोहा शहरातील श्री संत गाडगे महाराज ज्युनिअर कॉलेजच्या कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेत यश संपादन करत विक्रम करत यशाची परंपरा कायम ठेवली.

विज्ञानशाखेचा ९९.५० टक्के, कला ९४ टक्के तर कॉमर्सचा ९८ टक्के निकाल लागला आहे. याच कॉलेजमधील मोक्षदा जाधव ८७.३ टक्के गुण घेवून विज्ञानशाखेतून तालुक्यात प्रथम आली आहे. तेजश्विनी राऊत (८४.३३), खान रिफत फातेमा (८३.८३ टक्के) अशी आहे. तर कला शाखेतून - भाग्यश्री चव्हाण (७९.१७), ऋतुजा किरवले (७८.३३) देवके ओमसाई तृतीय (७७.६) टक्के गुण घेवून यशस्वी झाले आहेत.

तसेच अकाऊंट विषयात १०० पैकी १०० गुण घेऊन किर्तीमाला कोटे ही वाणिज्य शाखेत तालुक्यात प्रथम (९०.१७ टक्के) प्रथम आली आहे. याचबरोबर वैष्णवी बंडेवार तालुक्यात द्वितीय (८९.१७), कुंता ढगे तालुक्यात तिसरा (८७.८३) टक्के घेऊन यश संपादन केले आहे.

सदरील सर्व कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचे श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी कंधार संस्था अध्यक्ष प्रा.डॉ. पुरुषोत्तम केशवराव धोंडगे, सचिव माजी आ. गुरूनाथ कुरुडे, सहसचिव ॲड. मुक्तेश्वर धोंडगे, प्राचार्य दिलीप बोधगिरे, उपप्राचार्य दापकेकर, विज्ञान विभाग प्रमुख, वाणिज्य विभाग प्रमुख, कला विभाग प्रमुख, पर्यवेक्षक, बबन पवार, बी.आर. पाटील, विवेक घोरबांड, विश्वाभरं पाटील, गजानन जामगे, हरी शिंदे सर्व स्टाफ आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

## लोहा शहरात शिवा संघटनेच्यावतीने महात्मा बसवेश्वर महाराज जयंतीनिमित्त मिरवणूक



**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा शहरात शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवा संघटना तालुका शाखा लोहाच्यावतीने जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या ८९४ व्या जयंतीनिमित्त मिरवणूक काढण्यात आली. सदरील मिरवणुकीचे विसर्जन लोहा येथील व्यंकटेश गॉर्डन येथे करण्यात आले व या मिरवणुकीचे सभेत रूपांतर झाले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून शिवलिंग शिवाचार्य राजशेखर महाराज अहमदपूरकर, माजी नगरसेवक बबनराव निर्मले, महात्मा बसवेश्वर महाराज जयंती मंडळाचे स्वागताध्यक्ष माजी नगरसेवक युवराज वाघमारे, सेवा जनशक्तीचे जिल्हा प्रवक्ते उत्तमराव भागानागरे, शिवा संघटनेचे नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख इंजि. अनिल माळगे, शिवा कर्मचारी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष संजय कोठाळे, सेवा जनशक्ती पार्टीचे तालुकाध्यक्ष गोविंद हाबगुंडे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी बोलताना शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे म्हणाले की, शिवा संघटना तालुका शाखा लोहाच्या वतीने लोहा शहरात सलग १८ व्या वर्षी महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती काढण्यात आली आहे व दिवसेंदिवस जयंतीची मिरवणूक दरवर्षी मोठी निघत आहे. शिवा संघटनेमुळे महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा या राज्यात महात्मा बसवेश्वर महाराज यांची शासकीय जयंती होत आहे.

यावेळी प्रथम व्यासपीठावर महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या मुर्तीस वरील मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंती निमित्त व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिवा संघटनेचे लोहा तालुकाध्यक्ष हनुमंत भाऊ लांडगे, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बसवेश्वर धोंडे, जिल्हा उपाध्यक्ष मनोज शेलगावकर, शिवा कर्मचारी महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर घोडके सर, शिवा संघटना प्रणित महात्मा बसवेश्वर महाराज जयंती मंडळाचे अध्यक्ष प्रा. सुर्यकांत आणेराव, कोषाध्यक्ष अंकुश सोनवळे, कार्याध्यक्ष पिंटू वड्डे, माजी सरपंच कैलास धोंडे, शिवा व्यापारी आघाडीचे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर मानसपुरे, लक्ष्मण कांजले, साधू वडजे, बालाजी एकलारे, राजू पिल्लोळे, कुणाल बोडारे यांच्यासहित सर्व शिवा मावळ्यांनी व जयंती मंडळ समितीने परिश्रम घेतले.

कार्यक्रमांचे प्रास्ताविक महात्मा बसवेश्वर महाराज जयंती मंडळाचे अध्यक्ष प्रा. सुर्यकांत आणेराव यांनी केले तर सुत्रसंचलन प्रा. चंद्रकांत बेद्रे केले व आभार ज्ञानेश्वर मानसपुरे यांनी मानले.

## नांदेड वाघाळा मनपा कर्मचारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी गणेश नागरगोजे



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका पतसंस्थेच्या अध्यक्षपदी गणेश नागरगोजे तर उपाध्यक्षपदी आशाबाई घुले व सचिवपदी विशाल सोनकांबळे यांची बिनविरोध निवड झाली आहे. ही निवड निवडणूक अधिकारी एम.आर.येवते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत बिनविरोध निवड करण्यात आली.

नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका कर्मचारी पतसंस्थेच्यी पंचवार्षिक निवडणूक १३ एप्रिल रोजी झाली झालेल्या निवडणुकीत निवडून द्यावयाच्या १३ संचालक मंडळात सर्व मान्य आदर्श विकास पॅनलचे १३ उमेदवार एकतर्फी मोठ्या मताने विजयी झाले होते. त्यानंतर दि. ५ मे रोजी बैठक घेऊन ही निवड करण्यात आली.

बैठक यशस्वीतेसाठी कर्मचारी आनंद सरोदे, सुनिता गोरे, कविता खुपसे, संदीप वाघमारे यांनी सहकार्य केले.




# ऑपरेशन सिंदूरनंतर स्मार्टफोन वापरताना या ५ गोष्टींची खबरदारी घ्या, सैन्याला मदत मिळेल !

**भारताने बुधवारी पहाटे ऑपरेशन सिंदूर राबवले. यानंतर, पाकिस्तानकडूनही अगोदरपणा होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत, भारतीय सैन्य आपल्या सीमांचे रक्षण करण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे. मात्र या परिस्थितीत जर तुम्ही स्मार्टफोन वापरणारे असाल तर काही गोष्टींची खबरदारी घेतली पाहिजे. ज्यांची काळजी घेतल्यास तुम्ही केवळ स्वतःलाच नव्हे तर भारतीय सशस्त्र दलांनाही मदत करू शकता...**



### लोकेशन बंद ठेवा

तुमच्या स्मार्टफोनचे जीपीएस लोकेशन चालू ठेवल्याने तुमच्या रिअल-टाइम हालचाली ट्रॅक करता येतात. या तंत्राद्वारे शत्रू तुमचे स्थान शोधू शकतो. उदाहरणार्थ, जर तुम्ही मॉक ड्रिल किंवा युद्धाच्या परिस्थितीत बंकरमध्ये लपला असाल आणि तुमच्या फोनवरील लोकेशन चालू असेल, तर ते पकडले जाऊ शकते. म्हणून, तणावाच्या बाबतीत तुमचे स्थान बंद ठेवा.

### लष्करी ॲक्टिव्हिटीज शेअर करू नका

अलिकडेच, भारतीय लष्कराचे प्रसिद्ध माजी अधिकारी आणि लेखक, निवृत्त लेफ्टनंट जनरल केजेएस ढिल्लन यांनी सर्व नागरिकांना सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लष्करी सैन्याचे किंवा वाहनांचे फोटो किंवा व्हिडिओ शेअर करू नये, असे आवाहन केले होते. माध्यमांद्वारेही असेच आवाहन करण्यात आले आहे. आजकाल, प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोनच्या स्वरूपात कॅमेरा असल्याने, त्यांच्या आजूबाजूला होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या लष्करी हालचाली रेकॉर्ड करू नयेत आणि सोशल मीडियावर शेअर करू नयेत. ही सामान्य लोकांची जबाबदारी बनते. लेफ्टनंट जनरल ढिल्लन यांनी त्यांच्या अपीलात म्हटले होते की, असे केल्याने लोक नकळत शत्रूला मदत करू शकतात. अशा परिस्थितीत, स्मार्टफोन वापरकर्ता म्हणून, ही खबरदारी नक्कीच पाळा.

### अज्ञात लिंक्स किंवा मेसेजवर क्लिक करू नका

जर पाकिस्तानला युद्धसदृश परिस्थितीचा अवलंब करावा लागला तर ते सायबर हल्ले तीव्र करू शकते. अशा परिस्थितीत, कोणत्याही अनोळखी नंबरवरून येणाऱ्या मेसेज किंवा लिंकवर क्लिक करणे टाळा. या लिंक्स किंवा मेसेजमध्ये व्हायरस किंवा ट्रॅकिंग टूल्स असू शकतात. या काळात तुम्हाला "क्लिक करा आणि हल्ला कुठे झाला हे जाणून घ्या" असे संदेश असलेल्या लिंक्स मिळू शकतात परंतु अशा गोष्टी खऱ्या नाहीत. हे तुमचा फोन हॅक करण्याचा किंवा तुमची बँक साफ करण्याचा कट देखील असू शकतो.

### खोट्या बातम्या टाळा आणि पसरवू नका

सोशल मीडियावर खोट्या बातम्या खूप लवकर पसरतात. तणावपूर्ण परिस्थितीत, अफवांमुळे गोंधळ निर्माण होऊ शकतो. अशा परिस्थितीत, कोणतीही बातमी पुढे शेअर करण्यापूर्वी, ती आधी तपासा. असे करून तुम्ही अनावश्यक अराजकता आणि गोंधळ निर्माण होण्यापासून रोखू शकता. खोट्या बातम्यांचा खरा उद्देश लोकांमध्ये तणाव पसरवणे आणि समाजात अराजकता निर्माण करणे हा आहे. अशा परिस्थितीत, खोट्या बातम्यांचा प्रसार थांबवून आणि शक्य असल्यास, अशा गटांची तक्रार करून तुम्ही एक जबाबदार नागरिक म्हणून तुमचे कर्तव्य पार पाडू शकता.

### सोशल मीडियावरील प्रचार थांबवा

तणावपूर्ण परिस्थितीत, सोशल मीडियावर सर्व प्रकारचे प्रचार पसरवण्याचे प्रयत्न अनेकदा तीव्र होतात. अशा परिस्थितीत, तुम्ही कोणत्याही प्रचाराबद्दल योग्य माहिती देऊन त्याचा पर्दाफाश करू शकता.



हे करत असताना, विश्वसनीय स्त्रोतांकडून माहिती शेअर करा आणि सोशल मीडियावर तुमचे विचार शेअर करताना कोणाशीही वाद घालणे आणि चुकीच्या भाषेचा वापर करणे टाळा. तुमचा उद्देश प्रचार उघड करणे आणि कोणाशीही वाद घालणे नसावे.

## बळाचा वापर करावा लागला तर मी डोवाल यांना फोन करतो...

# मोदींशी भेट अन् पाकच्या हवाई संरक्षण यंत्रणेचा नाश!





**भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (NSA) अजित डोभाल यांनी पाकिस्तानमधील दहशतवादी अड्ड्यांविरुद्धच्या भारताच्या ऑपरेशन सिंदूरमध्ये मोठी भूमिका बजावली आहे. या कारवाईत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीर म्हणजेच पीओकेमधील ९ दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले. ज्यामध्ये संसद हल्ल्याचा मास्टरमाइंड मौलाना मसूद अझहरच्या कुटुंबासह अनेक दहशतवादी मारले गेले आहेत. डोवाल यांना नेहमीच 'ऑपरेशन्स मॅन' मानले जाते. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय सैन्याच्या ऑपरेशन सिंदूर दरम्यान डोभाल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत वारंवार बैठका घेतल्या. ऑपरेशनपूर्वी आणि नंतर डोभाल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत वारंवार केलेल्या बैठकींवरून असे दिसून येते की पाकिस्तानविरुद्ध आणखी मोठी कारवाई केली जाऊ शकते. गुरुवारी (८ मे) सकाळी डोभाल यांनी पंतप्रधान मोदींचीही भेट घेतली. यानंतरच, पाकिस्तानने भारतीय लष्करी तळांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याची बातमी आली, जी भारताने आपल्या सुदर्शन चक्राने म्हणजेच S-400 ने हाणून पाडली. पाकिस्तानची मेड इन चायना HQ-9 हवाई संरक्षण प्रणाली देखील नष्ट करण्यात आली आहे. यापूर्वी पाकिस्तानातील अनेक शहरांमध्ये ड्रोन हल्ल्यांच्या बातम्या आल्या होत्या. अजित डोवाल यांनी वेगवेगळ्या भूमिकांमध्ये देशाची सेवा केली आहे. ते वादातही अडकला आहे, पण त्यांच्या क्षमतेवर कोणीही शंका घेऊ शकत नाही. या ऑपरेशनची संपूर्ण कहाणी जाणून घेऊया...**

### पाकिस्तानची संरक्षण यंत्रणा नष्ट

कराची, गुजरांवाला, लाहोर, रावळपिंडीसह विविध शहरांमध्ये भारताने ड्रोन हल्ले केल्याचा दावा पाकिस्तानने केल्याचे वृत्त आहे. पाकिस्तानची हवाई संरक्षण प्रणाली HQ-९ नष्ट झाल्याचे सांगण्यात येत आहे. सकाळी डोभाल यांनी पंतप्रधान मोदींची भेट घेतली. ज्यामध्ये विविध रणनीतींवर चर्चा करण्यात आली. असे सांगितले जात आहे की पाकिस्तानने भारताच्या १५ शहरांतील लष्करी तळांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला होता, त्यानंतर ही कारवाई करण्यात आली. भारताने आपल्या एस-४०० संरक्षण प्रणाली म्हणजेच सुदर्शनने पाकिस्तानच्या सर्व उकसवणाऱ्या कारवाईला नष्ट केले.

### गुप्त अणुस्थळांबद्दल माहिती दिली...

डोभाल यांनी पाकिस्तानमध्ये गुप्तहेर म्हणून सात वर्षे घालवली आणि तेथे कार्यरत असलेल्या दहशतवादी गटांबद्दल गुप्त माहिती गोळा केली. एक वर्ष गुप्तचर एजंट म्हणून काम केल्यानंतर, त्यांनी इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्तालयात सहा वर्षे काम केले. प्रवीण दोथिन यांनी ऑगस्ट २०१७ मध्ये प्रकाशित झालेल्या 'अंडरकव्हरः अजित डोभाल इन थिअरी अँड प्रॅक्टिस' या त्यांच्या लेखात लिहिले आहे - पाकिस्तानमधील कार्यकाळात डोभाल यांनी कहूटा येथील पाकिस्तानच्या अणुऊर्जा प्रकल्पाजवळील एका न्हाव्याच्या दुकानातून पाकिस्तानी शास्त्रज्ञांच्या केसांचे नमुने आणले होते, ज्यामुळे कहूटा येथे कोणत्या दर्जाच्या युरेनियमवर काम केले जात आहे हे निश्चित करण्यात मदत झाली.

### गुप्तचर विभागातील दुसरे एनएसए

जरी एनएसए पदामध्ये संरक्षण, गुप्तचर आणि राजनैतिक दलाच्या जबाबदाऱ्यांचा समावेश असला तरी, आतापर्यंत नियुक्त केलेले बहुतेक एनएसए राजनैतिक दलाच्या क्षेत्रातील होते. ब्रजेश मिश्रा, जेएन दीक्षित आणि शिवशंकर मेनन हे मुत्सद्देगिरी क्षेत्रातील होते. डोवाल यांच्यापूर्वी, एमके नारायणन हे एकमेव व्यक्ती होते जे गुप्तचर विभागातून एनएसए बनले होते. सहसा NSA पडद्यामागे सल्ला देते. त्यांचे काम दिल्लीत बसून सर्वत्र माहिती गोळा करणे आणि सरकारला सल्ला देणे आहे.



### 'जर मला काठी वापरायची असेल तर मी डोभालला फोन करतो'

विशेष म्हणजे, भाजपचा प्रतिस्पर्धी काँग्रेसच्या कार्यकाळात अजित डोवाल यांना गुप्तचर विभागाचे प्रमुख बनवण्यात आले होते. अडवाणींशी जवळीक असूनही, त्यांचे नवीन राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेएन दीक्षित यांच्याशीही चांगले संबंध होते. जेएन दीक्षित यांच्यानंतर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार बनलेले एमके नारायणन उघडपणे म्हणायचे की जेव्हा जेव्हा मला कोणत्याही बाबतीत मवाळ दृष्टिकोन स्वीकारावा लागतो तेव्हा मी अमरजीत सिंग दुलतचा वापर करतो आणि जेव्हा जेव्हा मला बळाचा वापर करावा लागतो तेव्हा मी डोवाल यांना फोन करतो. याचा अर्थ असा की नारायणन यांनी वेगवेगळ्या परिस्थितीत वेगवेगळ्या लोकांना वापरले.

### मोदींकडून पहिली नियुक्ती डोवाल यांची...

२०१४ मध्ये भाजप सत्तेत आला तेव्हा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार पदासाठी अनेक नावांचा विचार करण्यात आला. यात माजी परराष्ट्र सचिव कंवल सिब्बल, विद्यमान परराष्ट्र व्यवहार मंत्री सुब्रह्मण्यम जयशंकर, माजी मुत्सद्दी हरदीप पुरी आणि अजित डोवाल यांचा समावेश होता. पण नरेंद्र मोदींनी फक्त डोवाल यांच्या नावाला मान्यता दिली. पंतप्रधान झाल्यानंतर मोदींनी पहिली नियुक्ती डोवाल यांची केली.

### पंतप्रधान मोदींच्या खूप जवळचे, एक शक्तिशाली व्यक्तिमत्व

अजित डोवाल हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जवळचे मानले जातात. दिल्ली दंगलींदरम्यान त्यांची सक्रियता आणि कलम ३७० रद्द केल्यानंतर काश्मीरमधील त्यांची उपस्थिती देखील बातम्यांमध्ये होती. गुप्तचर विभागात असताना त्यांनी अनेक महत्त्वाच्या कारवाया केल्या. काही राजकीय विश्लेषकांचा असा विश्वास आहे की ते मोदी आणि अमित शहा यांच्यानंतर भारतातील तिसरे सर्वात शक्तिशाली व्यक्ती आहेत. डोवाल हे भारताच्या इतिहासातील पाचवे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (एनएसए) आहेत. हे पद १९९८ मध्ये अमेरिकेप्रमाणे अटलबिहारी वाजपेयी सरकारने तयार केले होते. पहिले एनएसए ब्रजेश मिश्रा होते.

# पाकिस्तानी संसदेत खासदाराला रडू कोसळले!

भारताच्या ऑपरेशन सिंदूरचा परिणाम आता पाकिस्तानी संसदेतही दिसून येत आहे. एक दिवस आधी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी मुस्लिम देशांकडे पाकिस्तानसाठी पुढे येण्याचे आवाहन केले होते. आता पाकच्या एका खासदाराला भारताविरुद्ध बोलताना रडू कोसळले. त्याने पाकिस्तानला आणि स्वतःला वाचवण्यासाठी अल्लाहला प्रार्थनाही केली. या खासदाराचे नाव निवृत्त मेजर ताहिर इक्बाल आहे, तो पाकिस्तानी सैन्याचा माजी अधिकारी राहिलेला आहे. त्याने संसदेत पाकिस्तानचा कमकुवतपणा उघडपणे मान्य केला आणि सांगितले की आता फक्त अल्लाहच पाकिस्तानला वाचवू शकतो.

### ताहिर इक्बाल काय म्हणाले ?



मेजर ताहिर इक्बाल म्हणाले, की आमचा पाकिस्तान कमकुवत आहे. मी अल्लाहकडे प्रार्थना करतो, की तुम्ही आमच्यावर सोपवलेल्या या देशाचे रक्षण करा. हा तुमच्या प्रार्थनेचा देश आहे. आम्ही असहाय्य आहोत. आम्ही गुन्हेगार आहोत, पण आम्ही तुमचे प्रिय आहोत. कृपया आम्हाला क्षमा करा. आम्ही तुमच्यासमोर आपले डोके टेकवतो आणि क्षमा मागतो. यात काही शंका नाही की आम्ही मोठे गुन्हेगार आहोत, परंतु तुमची दया अफाट आहे. जर तुम्ही आमच्यावर दयाचा एक कणही पाठवलात तर इन्शा अल्लाह, आम्ही यशस्वी होऊ. या देशाचे रक्षण करा आणि त्यांना पराभूत करण्यासाठी आम्हाला शक्ती द्या, अशी प्रार्थना ताहिर इक्बालने केली आहे.

# अमेरिकेने पाकला दिला 'बुडून मरण्याचा' संदेश!

**७-८ मेच्या रात्री भारतातील अनेक शहरांवर हल्ला करण्याचा प्रयत्न करून पाकिस्तानने मोठी चूक केली आहे. त्याच्या अगोदरपणाला भारत कसा प्रतिसाद देईल याची त्याने स्वप्नातही कल्पना केली नसेल. आज दिवसभर पाकिस्तानातील सर्व शहरांमध्ये गोंधळ आहे. भारतीय सशस्त्र दलांनी प्रत्युत्तरादाखल पाकिस्तानचे अनेक हवाई संरक्षण रडार आणि प्रणाली नष्ट केल्या आहेत. पाकिस्तानसाठी सर्वात मोठा धक्का म्हणजे, अमेरिकेने पाकिस्तानला सुनावत बुडून मरण्याचा सल्ला दिला आहे. पाकिस्तानमधील अमेरिकन नागरिकांना एकतर ते ठिकाण सोडण्याचा किंवा स्वतःचा बचाव करण्याचा संदेशही त्यांनी दिला आहे...**

भारताने सातत्याने असे म्हटले आहे, की पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीर (पीओजेके) मध्ये ज्या नऊ ठिकाणी हल्ला केला होता ती ठिकाणे गेल्या अडीच दशकांत भारतातील बहुतेक दहशतवादी हल्ल्यांमध्ये दोषी असलेल्या दहशतवाद्यांशी संबंधित होती. ऑपरेशन सिंदूरदरम्यान कोणत्याही पाकिस्तानी नागरिकाला किंवा पायाभूत सुविधांना इजा पोहोचणार नाही याची भारतीय सशस्त्र दलांनी अत्यंत काळजी घेतली आणि कोणतेही पाकिस्तानी लष्करी प्रतिष्ठान कारवाईत येऊ दिले नाही. पण, आपल्या सवयीमुळे, पाकिस्तानने भारतीय शहरांवर हल्ला करण्याचा प्रयत्न करून स्वतःच्या नशिबाला आमंत्रण दिले आहे.





### एस-४०० ने पाकिस्तानी हल्ला हाणून पाडला...

भारतीय सैन्याने शत्रूच्या क्षेपणास्त्रे आणि रॉकेटना लक्ष्य करण्यासाठी हार्पी ड्रोनचा वापर केला. भारतीय हवाई दलाने त्यांची एस-४०० सुदर्शन चक्र हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणाली तैनात केली. एएनआयशी बोलताना, अनेक तज्ज्ञांनी सांगितले की ऑपरेशन यशस्वी झाले आणि लक्ष्ये नष्ट करण्यात आली. जेव्हा पाकिस्तानने लक्ष्मण रेखा ओलांडण्याचे धाडस केले तेव्हा गुरुवारी सकाळी भारतीय सशस्त्र दलांच्या कारवाईत पाकिस्तानच्या अनेक हवाई संरक्षण प्रणाली पूर्णपणे नष्ट झाल्या. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे लाहोरमध्येही पाकिस्तानची हवाई संरक्षण प्रणाली नष्ट झाली आहे. या कारवाईत पाकिस्तानचे HQ-9 एअर डिफेन्स मिसाईल लाँचर युनिट देखील मोठ्या प्रमाणात उद्ध्वस्त झाल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.



### भारतीय शहरांवर हल्ला करण्याचे प्रयत्न

गुरुवारी (८ मे २०२५) संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, काल रात्री पाकिस्तानने उत्तर आणि पश्चिम भारतातील अनेक लष्करी तळांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला. अवंतीपोरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, कपूरथळा, जालंधर, लुधियाना, आदमपूर, भटिंडा, चंदीगड, नई, फलोदी, उत्तरलाई आणि भुज येथे ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर करून हल्ला करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. परंतु, भारतीय सशस्त्र दलांनी यूएएस ग्रिड आणि उत्कृष्ट हवाई संरक्षण प्रणालीच्या मदतीने त्यांना पूर्णपणे हाणून पाडले. पाकिस्तानच्या ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचे अवशेष इकडे तिकडे दिसत आहेत, जे त्यांच्या नापाक प्रयत्नांची साक्ष देतात.

# नरेंद्र मोदी स्टेडियमला बॉम्बने उडवण्याची धमकी

## पाकिस्तानातून गुजरात क्रिकेट असोसिएशनला धमकीचा मेल

**मुंबई (प्रतिनिधी) –** भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानच्या दहशतवादाला चोख प्रत्युत्तर दिलं आहे. पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये भारताच्या २६ पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला होता. त्याचा बदला आता भारताने घेतला असून पाकिस्तानमधील नऊ दहशतवादी तळांना लक्ष्य केलं. त्याच पार्श्वभूमीवर गुजरातमधील नरेंद्र मोदी स्टेडियम बॉम्बने उडवून देण्याची धमकी आली आहे. गुजरात क्रिकेट असोसिएशनला पाकिस्तानमधून धमकीचा एक मेल आला आहे.

पकिस्तानमधून आलेल्या या ईमेलमध्ये 'आम्ही तुमच्या स्टेडियमला उडवून देऊ' असं लिहिले आहे. या धमकीनंतर सुरक्षा एजन्सींनी तपास सुरू केला आहे आणि अहमदाबादमधील स्टेडियम आणि त्याच्या आजुबाजुच्या परिसरात सुरक्षा वाढवली आहे.

नरेंद्र मोदी स्टेडियम हे आयपीएल २०२५ साठी म हत्त्वाचे ठिकाण आहे. १४ मे आणि १८ मे रोजी येथे गुजरात टायटन्स आणि इतर संघांचे सामने होणार आहेत. या पार्श्वभूमीवर, सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे आणि सर्व संबंधित यंत्रणांनी सतर्कतेने काम सुरू ठेवले आहे.

भारताने पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला असून पाकिस्तानात १०० किमी आत घुसून दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. भारताने पाकव्याप्त काश्मीरसह पाकिस्तानातल्या दहशतवाद्यांच्या नऊ तळांवर मध्यरात्री जोरदार आक्रमण केलं. दहशतवाद्यांचे नऊ तळ उद्ध्वस्त करून ऑपरेशन सिंदूर ही मोहीम फत्ते केली.

या मोहिमेत भारतीय सेनेनं पाकिस्तानी नागरिक किंवा पाकिस्तानी लष्कराच्या कोणत्याही ठिकाणांवर हल्ला केला नाही. भारतीय सेनेनं या मोहिमेत बहावलपूर, कोटली आणि मुझफ्फराबाद या तीन शहरांमधल्या केवळ अतिरेक्यांच्या तळांवर अचूक लक्ष्य साधलं. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सेनेनं बहावलपूरमध्ये जैश ए मोहम्म दचं हेडक्वार्टर उद्ध्वस्त केलं.

पाकिस्तानची ९ लक्ष्य बेचिराख करण्यासाठी भारताने राफेल आणि सुखोई ३० एमकेआय या विमानांचा वापर केला. राफेल विमानांनी अत्याधुनिक स्काल्प मिसाईल्स डागली. अतिदूरच्या लक्ष्यांवर मारा करण्यासाठी स्काल्प ही क्षेपणास्त्र वापरण्यात आली.

स्काल्प क्षेपणास्त्रांद्वारे ५०० किमी अंतरावरील लक्ष्यांचा वेध घेतला जातो. एक हजार किमी प्रतितास या वेगाने स्काल्प मिसाईल्स मारा करतात. विशेष म्हणजे शत्रूच्या रडारवर दिसत नसल्याने स्काल्प मिसाईल्स आली तरी पाकिस्तानची एअर डिफेन्स सिस्टीम कार्यान्वित झाली नाहीत. त्यामुळे पाकिस्तान ज्या एअर डिफेन्स सिस्टीमच्या वल्गना करत होता त्या फोल ठरल्या.

# स्कॉर्पिओची ट्रॅक्टरला धडक; ८ वऱ्हाडींचा मृत्यू, लग्नाच्या मंडपात शोककळा

**नवी दिल्ली(प्रतिनिधी)–** बिहारमधील कटिहार येथे सोमवारी रात्री एका भीषण अपघाताची घटना घडली आहे. यात लग्नातील ८ पाहुण्यांचा दुर्दैवी मृत्यू झालाय. तर अपघातात दोन जण जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हे सर्व १० जण एकाच स्कॉर्पिओम धून प्रवास करत असताना हा अपघात झाला आहे. ही घटना पोठिया पोलीस स्टेशन परिसरात घडली असून चांदपूर येथील हनुमान मंदिराजवळ उभ्या असलेल्या ट्रॅक्टरला स्कॉर्पिओकार धडकल्याने हा भीषण अपघात झालाय. यातील जखमींना प्राथमिक उपचारानंतर जीएमसीएच (पूर्णिया) येथे रेफर करण्यात आलंय. तर घटनेतील





सर्व मृत पूर्णियाच्या बधरा कोठी येथील धिबरा बाजारचे रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे.

घटनेनंतर आजूबाजूच्या परिसरातील लोकांची गर्दी घटनास्थळी जमली. माहितीनंतर पोलिसही घटनास्थळी पोहोचले. कटिहारच्या कुर्सेला पोलीस स्टेशन हद्दीतील कोशकीपूर येथे लग्नाचा कार्यक्रम होता. दुसऱ्या दिवशी वरात जात असताना वाटेत हा अनर्थ घडला. ज्यामध्ये ८ जणांना आपले प्राण गमवावे लागले आहे. दरम्यान, चांदपूर चौकात मक्याचा ढीग पाहून चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि त्यानंतर स्कॉर्पिओ थेट मक्याने भरलेल्या ट्रॅक्टरला जाऊन धडकली. या भीषण अपघातात आठ जणांचा जागीच मृत्यू झालाय.


जखमींमध्ये दोन तरुणांचा समावेश आहे. एकाचे नाव उदय कुमार आणि दुसऱ्याचे अभिषेक कुमार असल्याचे सांगितले जात आहे. दोघेही सुम रे २५-२६ वर्षांचे असल्याची माहिती पुढे आली आहे. दुसरीकडे, मृतांबद्दल अद्याप कुठलीही माहिती उघड झालेली नाही. एसडीपीओ-२ धर्मेंद्र कुमार म्हणाले की, संबंधित पोलीस ठाण्यातील पोलिसांना घटनास्थळी पाठवण्यात आले आहे. पोलिसही रुग्णालयात पोहोचले आहेत. मृतांची माहिती गोळा केली जात आहे. मात्र अपघाताच्या या बातमीनंतर लग्नाच्या आनंदात शोककळा पसरली आहे.

एका प्रत्यक्षदर्शी आणि लग्नाच्या पक्षातील एका व्यक्तीने सांगितले की, आम्ही दुचाकीवरून मागे होतो. रस्त्यावर मक्याचा ढीग होता. स्कॉर्पिओ पुढे जात असताना समोर एक ट्रॅक्टर उभा होता. त्यात मक्याचे दाणे भरलेले होते.

# १५ वर्षांपासून अंडरग्राऊंड नक्षलवादी एटीएसच्या जाळ्यात

**पुणे (प्रतिनिधी)–** गडचिरोलीच्या जंगलापर्यंत मर्यादित असलेला नक्षलवाद अत्यंत बेमालूमपणे पुणे, नागपूर, ठाणे सारख्या शहरातील सामान्य वस्त्यांपर्यंत पोहोचला आहे आणि नक्षलवादाचा खासकरून शहरी नक्षलवादाचा नवा टार्गेट मुंबई पुणे दरम्यानचा औद्योगिक बेल्ट असल्याची धक्कादायक माहिती ही समोर आली आहे. नुकतच पुण्यात प्रशांत उर्फ लॅपटॉप कांबळेला एटीएसने अटक केली. तो गेले अनेक वर्ष पुणे आणि जवळपासच्या भागात गोपनीय पद्धतीने राहून नक्षलवाद्यांसाठी काम करत होता.

तपास यंत्रणांकडून मिळालेल्या माहितीप्रमाणे



अनेक वर्षांपूर्वी जंगलातून विशेष टास्क घेऊन बाहेर पडल्यापासून लॅपटॉप कांबळेने कधी आदिवासी मुलांना शिकवण्याचे काम केले, तर कधी एखाद्या एनजीओमध्ये काम केले, अगदी पुण्यात डिलिव्हरी बॉय म्हणून काम करून तो शेकडो पुणेकरांच्या घरापर्यंत ही जात होता. प्रशांत उर्फ लॅपटॉप कांबळे जंगलातून निघून पुणे परिसरात सक्रीय आहे, याची माहिती मिळाल्यामुळे महाराष्ट्राच्या नक्षलविरोधी पथकाने त्याच्या नातेवाईकांच्या माध्यमातून त्याला आत्मसमर्पण करण्यासाठी अनेक वेळेला संपर्क केले होते, मात्र प्रत्येक वेळी त्याने आत्मसमर्पण करण्यास नकार दिले. कारण तो नक्षलवाद्यांच्या विचाराने प्रभावित होता आणि नक्षलवाद सोडायला तयार नव्हता. आता त्याला अटक झाल्यानंतर एटीएस आणि नक्षल विरोधी अभियानाचे पथक त्याची चौकशी करणार आहे.. मात्र, तपास यंत्रणांना शंका आहे की प्रशांत उर्फ लॅपटॉप कांबळे पुणे, खोपोली, रायगड या भागातील औद्योगिक पट्ट्यात सक्रीय राहून पुणे - मुंबई दरम्यान च्या औद्योगिक पट्ट्यात नक्षलवादी विचारसरणी पेरण्याच्या जुन्या उद्दिष्टासाठी कार्यरत होता.

# नशेचं इंजेक्शन देऊन सामूहिक अत्याचार; ७ जणांवर गुन्हा

**मुंबई (प्रतिनिधी)** टीटवाळा जवळील बल्याणी परिसरात राहणाऱ्या २१ वर्षीय तरुणीचा घरात आजीबरोबर वाद झाल्याने ती घर सोडून कामावर ओळख झालेल्या मैत्रिणीच्या घरी राहण्यास गेली. मात्र या मैत्रिणीने तिचा गैरफायदा घेत दुसऱ्या मैत्रिणीच्या मदतीने या तरुणीला नशेचे इंजेक्शन देत कोंडून ठेवले. तर मैत्रिणीच्या ओळखीतील चार ते पाच जणांनी तिच्यावर महिनाभर बलात्कार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पीडित तरुणीने टिटवाळा पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून टीटवाळा पोलिसांनी गुन्हा दाखल करत आरोपींचा शोध सुरु केला आहे. शबनम, जीनत, गुड्डू, गुलफाम, लियाकत, अली ईराणी आणि एक अनोळखी इसम अशी या आरोपींची नावे आहे.

बल्याणी परिसरात आपली आजी आणि चुलत भाऊ बहिणीसोबत राहणारी २१ वर्षीय तरुणी घर बांधणीवर मजुरी करून कुटुंबाला हातभार लावते. तरुणीचे आजीबरोबर १९ मार्च रोजी रात्री १० वाजता भांडण झाल्याने तिने रागाच्या भरात घर सोडले. आपल्याबरोबर बांधकाम साईटवर काम करताना ओळख झालेल्या मैत्रीण जिनत हिच्या बल्याणी येथील घरी गेली. तर दुसरी मैत्रीण शबनम तिच्याच शेजारी राहत असल्याने सदरची तरुणी कधी जीनतच्या तर कधी शबनमच्या घरी राहत होती.

# पंतप्रधान मोदींचा युरोपीय देशांचा परदेश दौरा रद्द

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबवण्यात आले. भारताने पाकिस्तानातील दहशतवाद्यांची ९ तळं नष्ट केले. यामुळे सीम वरील तणाव अधिकच वाढला आहे. यापार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आगामी नॉर्वे, क्रोएशिया आणि नेदरलँड या युरोपीय देशांचा दौरा रद्द करण्यात आला आहे.

भारताने पाकिस्तानवर केलेल्या एअर स्ट्राईकचे पंतप्रधान मोदी हे मॉनिटरिंग करत होते. यावेळी त्यांच्यासोबत अजित डोवालही उपस्थित होते. ते पीएम मोदी यांना प्रत्येक वेळेची अपडेट देत होते. त्यामुळे हल्ल्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी ७, कल्याण मार्ग येथून या मोहिमेवर लक्ष ठेवून होते. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजीत डोवाल हे त्यांना प्रत्येक क्षणाची माहिती देत होते.

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला म्हणून भारताने पाकिस्तानातील ९ दहशतवादी अड्ड्यांवर हवाई हल्ले केले. पहलगाम हल्ल्याच्या १४ दिवसांनंतर, भारताच्या तिन्ही सैन्याने पाकिस्तानला योग्य उत्तर देण्यासाठी 'ऑपरेशन सिंदूर' राबवण्यात आले.

भारतीय सैन्याच्या या कारवाईनंतर पाकिस्तान सीमेवर अलर्ट जारी करण्यात आला आहे. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी संरक्षण तुकड्या सक्रिय करण्यात आल्या आहेत.

दरम्यान पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखालील कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटीची (सीसीएस) बैठक घेण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी ऑपरेशन सिंदूर नंतरच्या परिस्थितीवर सविस्तर चर्चा केली.


## टी.सी. हरवली

माझी सतीश प्रभाकरराव वाकडे या नावाची बी.कॉम तृतीय वर्ष पासची टीसी नम स्कार चौक ते आनंदनगर नांदेड ऑटो प्रवास करताना हरवली आहे. कुणास सापडल्यास कळवावे.

–संपर्क पत्ता –
सतिश प्रकभाकरराव वाकडे रा.वृदावन कॉलनी भाग्यनगर जवळ नांदेड
४३१६०५
मो.७३८५५६३३४५


# सायबर गुन्ह्यांपासून बचावासाठी नागरिकांनी सजग रहावे –देवरे

**मुंबई(प्रतिनिधी)** डिजिटल युग अधिक प्रगत होत आहे, तसतसे सायबर गुन्ह्यांचे स्वरूप बदलत आहे. सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर सर्वसाम न्य नागरिकांनी अधिक सजग राहावे, असे आवाहन नॅस्कॉमचे अधिकारी प्रसाद देवरे यांनी सांगितले.

'टेक-वारी' कार्यक्रमाच्या निमित्ताने मंत्रालयात 'सायबर सुरक्षा' विषयावर प्रसाद देवरे यांचे व्याख्यान झाले. त्यावेळी ते बोलत होते.

श्री.देवरे म्हणाले, डीप फेक व्हिडिओ, डेटा चोरी रोखण्यासाठी सतर्कता बाळगा. सर्व ऑनलाइन खात्यांसाठी मजबूत पासवर्ड ठेवा तसेच दुहेरी प्रमाणीकरण प्रणाली वापरा. अनोळखी व्यक्तींचे ई-मेल, मेसेजमधील लिंक्स उघडू नका. स्म र्टफोन, लॅपटॉप आणि 'आयओटी' डिव्हाइसेसचे सॉफ्टवेअर वेळोवेळी अपडेट करा. सार्वजनिक वायफाय वापरताना काळजी घ्या. बँकिंग किंवा खरेदीसाठी फक्त बँक किंवा अधिकृत प्रदात्यांचे ॲप्स वापरा.

सायबर गुन्हेगार वेगवेगळ्या क्लृप्त्यांनी सामान्य जनतेला आपल्या जाळ्यात अडकवतात. त्यामुळे कोणताही संशयास्पद मजकूर किंवा संदेश फॉरवर्ड करताना प्रत्येकाने अत्यंत सतर्क राहावे. सायबर सुरक्षितेसाठी काळजी घेणे ही आजच्या काळाची नितांत गरज असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# आश्रमशाळांच्या समस्या प्राधान्याने सोडविणार–मंत्री सावे

**मुंबई(प्रतिनिधी)–** आश्रमशाळांच्या म ध्यमातून चांगले विद्यार्थी घडविण्यासाठी प्रयत्न होत असतात. त्यामुळे इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या विमुक्त जाती आणि भटक्या जमाती (विजाभज) प्रवर्गाच्या निवासी आश्रमशाळांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यात येणार असल्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली स्वयंसेवी संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या खासगी अनुदानित निवासी आश्रमशाळांतील अडचणींबाबत मंत्रालयात बैठक घेण्यात आली. या बैठकीस इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच निवासी आश्रमशाळांचे संस्थाचालक उपस्थित होते.


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेंडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## Change In Name

My old name is KHURSHED BEGUM.which now I am changing as NEW NAME KHURSHEED BEGUM henceforth my all correspondence will be done as per new name please consider the same Under ADD-W/O MOHAMMAD YASEEN ALI H.N.9-4-1158 DEGLOOR NAKA ROAD NEAR MAQDUM MASJID MADINA NAGAR ITWARA NANDED MO.9975116625

## Change In Name

My Old Name is VIDNYAN KISHANRAO LONE BEFORE MARRIGE.which now I am changing as New Name NEHA UNMESH DHAWALE AFTER MARRIGE MR. UNMESH JANARDHAN DHAWALE IN JUNE 1999. Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same SING BY-NEHA UNMESH DHAWALE PRABHAT NAGAR NEAR NAGSEN HIGH SCHOOL TARODA BK NANDED 431605 MO.9923398405

## जाहीर प्रगटन

मौजे अर्धापुर ता.अर्धापुर जि नांदेड हद्दीतील देगाव येथील गट नंबर/ सर्व्हे नंबर १५६ पैकी ६६ आर शेत जमिन बळीराम बजाजी उबाळे यांचेकडून किशन बजाजी उबाळे यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

तरी वरील शेत जमिनी बद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/ आक्षेप हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर शेत जमिनीचे खरेदी खत करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

शेत जमिनीची चर्तुसिमा पुर्वेस-लिहून घेणार यांचे शेत, पश्चिमेस- आसना नदी, दक्षिणेस-चंद्राबाई शिव-ाजी पाटील उबाळे यांचे शेत, उत्तरेस- गोविंद तातेराव उबाळे यांचे शेत

जाहीर प्रगटन देणार
ॲड.मोहमद रासेद मो.७७७५०५८७७७

## टी.सी. हरवली

माझी बालाजी रामचंद्र जाधव या नावाची दहावी नापास ची टीसी देगलूर ते नांदेड प्रवास करताना हरवली आहे. कुणास सापडल्यास कळवावे.

संपर्क पत्ता
बालाजी रामचंद्र जाधव
मु. पो. टाकळी वळग ता. देगलूर जि. नांदेड

## Change In Name

My old name is PADMAKAR RAMRAO DESHMUKH,(OLDNAME) which now I am changing as PADMAKARRAO RAMRAO DESHMUKH, (NEW NAME)henceforth my all correspondence will be done as per new name please consider the same Under sigen by PADMAKARRAO RAMRAO DESHMUKH, 01-09-191, Deshmukh Niwas, Near Mauali Agro Agency,New Mondha , Nanded, Maharashtra,431601 Mob - +91 9604195902

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार राजकुमारीबाई नारायणसिंग चौव्हाण रा. सिघ्नाथपुरी नांदेड ता. जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिति आणि अधिकारानुसार सर्व जनतेस व संबंधीतांना सुचीत करण्यात येत की. माझ्या पक्षकारांच्या मालकी व ताब्यातील मिळकत जी त्यांच्या हक्कात दानपत्र दस्त क्र.०७१२५/२००७ दि. १४.१२.२००७ रोजीनुसार माझ्या पक्षकारांची आई श्रीमती सुलोचनाबाई भ्र. नारायणसिंग चौव्हाण यांनी दिली असुन त्याद्वारे माझी पक्षकार खालील वर्णनाच्या मिळकतीची मालक व ताबेदार मिळकत मौजे सिध्दनाथपुरी ता. जि. नांदेड येथील नावाशमनपा हदीतील मिळकत आखीव पत्रीका क्र. १३७३७, मनपा मालमत्ता क्र. ८-२-११, ८-३-१६९ जुना असुन नवीन मनपा क्र.८-३-१७२ पैकी घर ज्याची लांबी पुर्व पश्चिम उत्तरेकडुन ५० फुट ३ इंच दक्षिणेकडुन ५१ फुट ३ इंच व रुंदी दक्षिण उत्तर पुर्वेकडुन २७ फुट ३ इंच पश्चिमेकडुन ३६ फुट ३ इंच ज्याचे एकुण क्षे.१६१५.४४ चौ. फुट म्हणजेच १५०.१३ चौ. मी. ज्यावर कच्चे पक्के विटामातीचे बांधकाम केलेले आहे ज्याचे बांधकाम क्षे.५०० चौ.फ ुट आहे ज्याची चतुर्सिमा पुर्वेस:पुरभा मानेजी यांचे घर आहे, पश्चिमेस: मन्सुर बेग यांचे घर आहे व जाण्यासाठी एक मोठा रस्ता आहे, दक्षिणेस: विनायकराव कुरुंभटटे यांचे घर आहे आणि उत्तरेस: अजीज खान गौसखान यांचे घर आहे.

अश्या वर्णनाची वरील पुर्ण मिळकतीचे मालक व ताबेदार माझे पक्षकार असुन सध्या ते या मिळकतीचे आपल्या मर्जीप्रमाणे उपभोग घेत आहे माझ्या पक्षकारांची वरील मिळकत त्यांची आई त्यांना माझे पक्षकारांचे भाऊ यांच्या संमतीने दानपत्र म्हणुन वरील उल्लेखीत दुय्य निबंधक कार्यालय नांदेड येथुन नोंदणीकृत दानपत्रामध्ये वरील मिळकत दिली आहे त्याद्वारे माझे पक्षकार हे मालक व ताबेदार आहे.

तरी सर्व जनतेस आणि संबंधितांना सुचित करण्यात येते की, वरील मिळकत माझे पक्षकार लवकरच आपल्या आर्थीक गरजेपोटी विक्री करण्याचा करार करीत आ-हेत तरी वरील मिळकती संबंधी जर कोणाचेही कसल्याही प्रकारे हक्क अधिकार, उजर आक्षेप, अडथळा असेल तर त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवासाच्या आत आपले उजर -आक्षेप कागदोपत्री पुराव्यासह माझ्या कार्यालयात लेखी नोंदवावा. मूदतीत उजर-आक्षेप न आल्यास माझे पक्षकार वरील व्यवहार पुर्ण करतील मुदती नंतर आलेले उजर, आक्षेप, गृहीत धरले जाणार नाही, आणि माझे पक्षकार बंधनकारक राहणार नाही.करीता हे जाहीर प्रगटन दि.०८.०५.२०२५

मार्फत, जाहीर प्रगटन देणार
ॲड.इम्रान खान पठाण राजकुमारीबाई नारायण सिंग चौहाण
नांदेड मो.९४२३७५९०७९ रा.सिद्धनाथपुरी नांदेड मो.७४९९२४७५१२


# वीज कामगार को–ऑप क्रेडिट सोसायटी लि. नांदेड

## ब–१ निविदा सूचना क्र. (१) वर्ष २०२५ २०२६

जा.क्र.वीकासो/२०२५-२६४९ दिनांक ८/५/२०२५

खालील कामाच्या ब-१ प्रचलीत सीलबंद निविदा योग्य स्थापत्य कामाकरिता महा. शासन नोंदीकृत कंत्राटदाराकडून मानदसचिव वीज कामगार को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. नांदेड. दुरध्वनी क्र. (७८७५९६४२२२) हे मागवीत आहेत प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा सक्षम अधिकाऱ्याकडून शक्य झाल्यास त्याच दिवशी किंवा दि. २०.०५.२०२५ रोजी दुपारी १.३१ वाजता उघडण्यात येतील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित किंमत लक्ष | इसारा रक्कम रु.लक्ष | काम पुर्ण करण्याचा कालावधी | कोऱ्या निविदा पुस्तकाची किंमत | कोऱ्या निविदा मिळण्याचे ठिकाण व कालावधी सुट्टीचे दिवस वगळून | मोहरबंद निविदा स्विकृतीचा दिनांक व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वीज कामगार को-ऑप क्रेडीट सो. लि. नांदेड. महादेव दालम ील येथील प्लॉट क्र.१४.१५,१६ ईमारतीचे लाईट फिटींगचे काम | ६,६०००० जी.एस.टी सह | ०.०७ | १ महिना | २०००/- | दि.१०/५/२०२५ ते १९-५/२०२५ वीज कामगार को-ऑप क्रेडीट सो. लि. नांदेड. महादेव दालम ील च्या बाजूस | वीज कामगार को-ऑप क्रेडीट सो. लि. नांदेड. महादेव दालमील च्या बाजूस नांदेड येथे १९/५/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत |

१) वीज कामगार को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. नांदेड, महादेव दालमीलच्या बाजुस नवा मोंढा नांदेड. यांचे कार्यालया मध्ये नोटीस बोर्डावर सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल.

२) सदरील निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकार्याने राखून ठेवला आहे.

३) निविदा मूल्य परतावा आहे.

मानद सचिव
वीज कामगार को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. नांदेड.

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट, पहिला मजला,
शिवाजी नगर, नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षापासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने आ. बोंढारकर यांनी घेतली बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)**–सुप्रीम कोर्टाच्या निकालामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे येत्या काही आठवड्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होणार असल्याने शिवसेनेच्यावतीने या निवडणुका ताकदीने लढण्याच्या अनुषंगाने आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय विश्रामगृह येथे नांदेड दक्षिण शिवसेनेची बैठक पार पडली.




शिवसेना पक्षप्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात शिवसेनेला मोठे बळ मिळवून देण्यासाठी प्रत्येक शिवसैनिकांनी व पदाधिकाऱ्यांनी जोमाने कामाला लागावे. येणाऱ्या काळात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घोषित होणार आहेत. नांदेड महानगरपालिकेसह नांदेड जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिकांवर शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी आणि शिवसैनिकांनी कंबर कसून कामाला लागावे. राज्यात महायुतीचे सरकार असल्यामुळे पक्षाचे वरिष्ठ नेते जे धोरण ठरवतील त्या धोरणानुसार आपल्याला निवडणुकीची रणनीती ठरवायची आहे. त्यामुळे आता ही निवडणूक कार्यकर्त्यांची असणार असल्याने प्रत्येक कार्यकर्त्यांनी आपापल्या भागात निष्ठेने कामाला लागावे. जनतेच्या प्रश्नाकडे अधिक लक्ष द्यावे. शिवसेनेची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोहोचवावीत. मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी केलेली कामे जनतेपर्यंत पुन्हा न्यावीत. लाडक्या बहिणींशी संवाद वाढवावा. लाडक्या भावांशीही संवाद वाढवावा. शेतकरी, कामगारांसह, शोषित, पीडित, वंचितांच्या न्याय हक्कासाठी शिवसैनिकांनी आणि कार्यकर्त्यांनी पुढे यावे. याच बळावर आपल्याला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकायच्या आहेत अशा सूचनाही आ. बोंढारकर यांनी बैठकीत दिल्या आहेत. दरम्यान शिवसेनेच्या वतीने येत्या काही दिवसांत आर्थिकदृष्ट्या मागास असणाऱ्या सर्वच घटकातील वधू-वरांचा सामूहिक विवाह मेळावा घेण्याचा संकल्पही यावेळी आ. बोंढारकर यांनी व्यक्त केला.

या बैठकीस उपस्थित शिवसेना संपर्कप्रमुख दत्तात्रय पईतवार, जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, जिल्हा परिषद सदस्य रावसाहेब महाराज, जिल्हा संघटक शंकर पिनोजी, सहसंपर्क प्रमुख स. गुरमितसिंघ टमाना, उपजिल्हाप्रमुख बिल्लु यादव, विधान सभाप्रमुख अशोक उमरेकर, शहरप्रमुख तुलजेश यादव, शहरप्रमुख सुहास खराणे पाटील, तालुकाप्रमुख उद्धव पाटील शिंदे, तालुकाप्रमुख अशोक मोरे, युवासेना जिल्हाप्रमुख अमोदसिंघ साबळे, तालुकाप्रमुख बालाजी पाटील सपुरे, शहरप्रमुख विजय यादव, महिला आघाडी जिल्हा प्रमुख वनमालाताई राठोड, जिल्हा प्रमुख गीताताई पुरोहित, तालुका प्रमुख स्नेहाताई पाटील, आम्रपल्वी शिंदे, अवतारसिंघ पहरेदार, लड्डू भाई, शेख सिराज, रोशनसिंघ जागीरदार, बालाजी पाटील भायेगावकर, रवी थोरात, मारुती धुमाळ, पप्पू गायकवाड, सुरेश वांगीकर, दुर्गेश बागडे, सचिन पवार, स्वराज यादव, रामेश्वर काळे, दशरथ कंधारे, कामाजी पाटील, सुदिन बागल, तुकाराम पवार, माऊली मोरे, संजय दुलधानी, गजानन गिरी, गजेंद्र ठाकूर, कृष्णा देशपांडे, दीपक पांचाळ, राजू खांडे, देवा पाटील, कुलदीप भद्रे, विक्रम बामणीकर, शंकर सिरसाठ यांच्यासह मतदारसंघातील आजी-माजी पदाधिकारी होते.

## महानगरपालिकेत आयुक्तांच्या हस्ते ३ अग्निशमन वाहनांचे लोकार्पण

**नांदेड (प्रतिनिधी)**– महानगरपालिका सेवेचे बळकटीकरण करण्यासाठी अग्निशमन विभागाकरिता जिल्हा वार्षिक योजनेतून प्राप्त झालेल्या नवीन ३ अत्याधुनिक अग्निशमन वाहनांचे लोकार्पण गुरुवार, दि. ८ मे रोजी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. महेकशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते करण्यात आले.



महापालिकेच्या अग्निशमन विभागातर्फे नांदेड शहर, संपूर्ण जिल्हा व जिल्ह्याबाहेरसुध्दा सेवा पुरविली जाते. अग्निशमन व आणीबाणी सेवा ही अत्यावश्यक सेवा असून, आग, रेस्क्यु, नैसर्गिक आपत्ती वा मानवनिर्मित दुर्घटनेमध्ये तातडीने आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आवश्यक त्या संसाधनासह सजग राहुन सेवा द्यावी लागते. नांदेड शहराची वाढती लोकसंख्या तसेच शहरातील व शहरालगतच्या क्षेत्रात व्यावसायीक इमारती, मॉल्स, दवाखाने, औद्योगिक इमारती यांचे वाढते प्रमाण विचारात घेता नांदेड महानगरपालिकेच्या अग्निशमन सेवेचे बळकटीकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी महोदयांनी जिल्हा वार्षिक योजनेतून उपलब्ध करुन दिलेल्या निधीनुसार नव्याने ३ अत्याधुनिक वाहनांची बांधणी करुन व ६१० आणि -२५० या तीन वाहनांची महापालिकेच्या अग्निशमन ताफ्यात भर पडली आहे.

सदरील तिन्ही अग्निशमन वाहने विविध आगीच्या घटनास्थळी जलद गतीने पोहचून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपा आयुक्तांच्या हस्ते या वाहनांचे लोकार्पण करण्यात आले. या तीन नवीन वाहनांची मनपा ताफ्यात भर पडल्यामुळे महापालिकेची अग्निशमन सेवा अधिक सक्षम होणार असल्याचे यावेळी आयुक्तांनी प्रतिपादन केले.

याप्रसंगी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्यासह उपआयुक्त सुप्रिया टवलारे, नितीन गाढवे, स. अजितपालसिंघ संधू, शहर अभियंता सुमंत पाटील, लेखाधिकारी श्रीनिवास चन्नावार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सुरेशसिंह बिसेन, सिस्टीम मॅनेजर सदाशिव पतंगे, सहाय्यक आयुक्त मो. गुलाम सादेक, उपअभियंता प्रकाश कांबळे, दिलीप टाकळीकर, सतीश ढवळे, अग्निशमन अधिकारी के. जी. दासरे, निलेश कांबळे, क्षेत्रिय अधिकारी रमेश चवरे, रावण सोनसळे, गौतम कवडे, निलावती डावरे, अग्निशमन विभागाचे योगेश पेरकेवाड यांच्यासह मनपा कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## धरणविरोधी समितीने चिमटा धरणाचे काम बंद पाडले

**किनवट (प्रतिनिधी)**– निम्न पैनगंगा प्रकल्पाचे काम बुधवार, दि. ७ मे रोजी पाटबंधारे विभागाने सुरू केल्याची माहिती मिळताच बुडीत क्षेत्रातील वातावरण एकदम ढवळून निघाले. लगेच दुसऱ्या दिवशी गुरुवार, दि. ८ मे रोजी निम्न पैनगंगा धरणविरोधी संघर्ष समिती विदर्भ-मराठवाडाच्या पदाधिकारी व शेतकऱ्यांनी खंबाळा येथे सुरू असलेले धरणाचे काम बंद पाडले.



चिमटा धरणाच्या विरोधात यापूर्वी अनेकदा आंदोलने झाली. संघर्ष समितीचा विरोध झुगारून खंबाळा येथे पाटबंधारे विभागाने धरणाचे काम सुरू केल्याची माहिती मिळताच बुडीत क्षेत्रातील संतप्त शेतकऱ्यांनी गुरुवारी सकाळी १० वाजता धरणविरोधी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांसह आक्रमक पवित्रा घेत सुरू असलेले धरण रेषेचे काम बंद पाडले.

काम बंद आंदोलनात निम्न पैनगंगा धरणविरोधी संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रल्हादराव पाटील जगताप, यवतमाळ जि. प. चे माजी उपाध्यक्ष मुबारक तंवर, प्रल्हादराव गावंडे, बंडू नाईक, विजय पाटील राऊत, विजय समगिर, बंटी पाटील जोमदे, निलेश कुमरे, माणिक कोवे, गुलाब मेश्राम, विजय पाझारे, गजानन डाखोरे, जयराम मिश्रा, विठ्ठलराव अडकिने, विलास गावंडे, उत्तमराव भेंडे, अतुल वानखडे, पंजाबराव जगताप, विष्णू गावंडे, बंडू कुळसंगे, रवी भोंगाडे, सुभाष मिरासे, प्रमोद जगताप, रितेश राऊत, कैलास देशमुख, संतोष बोटरे, जयराम मिश्रा यांसह अनेक धरणविरोधी कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

## अर्धापुरात घरासमोरील लावलेली मोटारसायकल अज्ञात इसमाने जाळली

**अर्धापूर (प्रतिनिधी)**– घरासमोर लावलेली हिरोहुंडा स्प्लेंडर मोटारसायकल अज्ञात इसमाने जाळल्याची घटना बुधवार, दि. ८ मे रोजी मध्यरात्री १ ते १-३० वाजता घडली. या घटनेत तीस ते चाळीस हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येते.



अर्धापूर शहरातील कृष्णा नगर येथील भगवान हांडे यांच्या घरासमोर मोटारसायकल लावली होती. मध्यरात्री घरात धूर गेल्यामुळे या धुराने जागे होऊन बघितले असता मोटारसायकल क्रमांक एम. एच. २६-सी. एम. ७३९४ अचानक लागलेल्या आगीत ५०% जळाली. घरासमोर अनेकांची वाहने उभी केली असतात. काही खोडसाळ मंडळी मोटारसायकलचे नुकसान करण्याच्या उद्देशाने वाहने पेटवीत असल्याने जनतेमध्ये भीतीचे वातावरण निमर्ाण झाले आहे. पोलिसांनी रात्री उशिरापर्यंत बेकायदेशीरपणे नुकसान करणारांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

## शेत-पाणंद रस्ते अतिक्रमण मुक्तीसाठी 'सस्ती अदालती'चे आज आयोजन

### प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी 'सस्ती अदालत'

**नांदेड (प्रतिनिधी)**– शेतरस्ते व पाणंद रस्ते अतिक्रमण मुक्त करण्यासाठी येत्या शुक्रवार, दि. ९ मे रोजी नांदेड जिल्ह्यात सर्व तहसील कार्यालय किंवा मंडळ मुख्यालय ठिकाणी सस्ती अदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील गरजू शेतकऱ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

राज्यात जे शेतरस्ते, पाणंद रस्ते अस्तित्वात आहेत त्यांना क्रमांक देण्यात यावेत. शेत-जमिनीमध्ये वहिवाट करण्यासाठी अस्तित्वात असलेले रस्ते काही ठिकाणी अरुंद आहेत, अशा ठिकाणी मोठी वाहने जाण्यास अडचण निर्माण होवून तक्रारी होतात. यामुळे राज्यातील सर्व शिवपाणंद आणि शेतरस्त्यांची हद्द निश्चित करून त्यांची कामे दर्जेदाररित्या पूर्ण करण्यात येणार आहेत. हे शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर महसूल प्रशासनामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे. शेत वहिवाट रस्त्याची तक्रार सुनावणी तहसीलदार यांच्याकडे होते. अशा रस्त्यांबाबत प्रलंबित असलेली प्रकरणे एका महिन्यात निकाली काढावीत, असे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.

मराठवाडा विभागातील आठही जिल्ह्यातील गरजू नागरिक शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते, पाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी तसेच जलद न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी तहसील कार्यालयात किंवा मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी 'सस्ती अदालत' उपक्रम राबविण्यात येणार आहे. यात पाणंद अतिक्रमित रस्त्यांबाबतचे प्रलंबीत प्रकरणे निकाली काढली जाणार आहेत. शुक्रवार, दि. ९ मे रोजी नांदेड जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालय स्तरावर, मंडळ अधिकारी स्तरावर सस्ती अदालत उपक्रम राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

## पसंती क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– परिवहनेतर संवर्गातील मोटार-सायकल वाहनांसाठी एमएच-२६-सीयू ही नवीन मालिका लवकरच सुरू होणार आहे. ज्या अर्जदारांना पसंती क्रमांक घ्यावयाचा आहे त्यांचे आधार कार्ड, पॅनकार्ड, मोबाईल नंबर व ईमेल सह अर्ज ९ मे २०२५ रोजी दुपारी २.३० पर्यंत स्विकारण्यात येणार आहेत. त्यानंतर पसंती क्रमांकासाठी अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

ज्या पसंती क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास ९ मे २०२५ रोजी दुपारी ४ वाजता Text message// दूरध्वनीद्वारे संबंधीत अर्जदारास कळविण्यात येईल. सर्वांनी याबाबतची नोंद घ्यावी असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

## दुकानं फोडणारी टोळी जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहर व परिसरात किमती सामानांची दुकानं फोडणाऱ्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. त्यांच्याकडून रोख रक्कम असा जवळपास एक लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी नांदेड शहरात चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीतांचा शोध घेवून त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना आदेश दिले होते. त्या अनुषंगाने बुधवार, दि. ७ मे रोजी पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड व त्यांच्या पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार असे तामसा पोलीस ठाण्यात गुरन ८४/२०२५ कलम ३३१ (४) ३०५ (अ), ३(५) भा.न्या.सं. चोरीमधील आरोपी शोधकामी नांदेड शहरात गेले होते त्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून एक इसम मोटारसायकल चोरी करून मालेगाव ते नांदेड रस्त्यावरुन जात आहे अशा माहितीवरुन त्या संशयीत इसमास वाहनासह पासदगाव ब्रिज येथे थांबवून ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता त्याने त्याचे नाव शंकर ऊर्फ सोनु पिराजी पवार (वय २२ वर्षे व्यवसाय मजुरी रा. कारखाना रोड वसमत जि. हिंगोली) असे सांगितले. त्याच्या ताब्यातील मोटारसायकल, मोबाईल बाबत त्यास विचारपूस केली असता त्याने सांगितले की, तो व इतर तीन विधीसंघर्षीत बालक यांनी मिळून सदर मोटारसायकल, मोबाईल, नगदी रुपये असे तामसा, उस्माननगर जि. नांदेड व औंढा जि. हिंगोली येथील दुकाने फोडून चोरी केली आहे असे सांगीतले. त्या आधारे त्यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून मोटारसायकल, मोबाईल व नगदी रुपये जप्त केले आहेत.

सदर आरोपीविषयी पो. स्टे. अभिलेखावर पाहणी केली असता यातील आरोपी व इतर तीन विधीसंघर्षग्रस्त बालक याचे सोबत मिळून १. पो.स्टे. तामसा गुरन ८४/२०२५, २. पो.स्टे. तामसा गुरन ८५/२०२५ ३. पो.स्टे. उस्माननगर गुरन ६६/२५, ४. पो.स्टे. औंढा जि. हिंगोली गु.र.नं ३०८/२५ असे गुन्हे केल्याचे प्रथम चौकशीत निष्पन्न झाले.

## शांतीदूत गोविंदराव पाटील चिखलीकर यांना स्मृतिदिनानिमित्त मान्यवरांचे अभिवादन

**नांदेड :** शांतीदूत गोविंदराव पाटील चिखलीकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त गुरुवारी चिखली येथे त्यांच्या समाधीस्थळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी समाधीचे दर्शन घेऊन अभिवादन केले.

सामाजिक व राजकारणाचा वसा जपत नांदेड जिल्ह्याच्या राजकारणात आणि समाजकारणात स्वतःच्या नावाची वेगळी ओळख निर्माण करणारे शांतीदूत गोविंदराव पाटील चिखलीकर यांच्या आठव्या स्मृतिदिनानिमित्त गुरुवारी चिखली येथे अभिवादनाचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यासह चिखलीकर कुटुंबीयांनी शांतीदूत गोविंदराव पाटील चिखलीकर यांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार अविनाश घाटे, माजी आमदार सुभाषराव साबणे, राष्ट्रवादी दिव्यांग विभागाचे प्रदेश कार्याध्यक्ष रामदास पाटील सुमठाणकर, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दिलीप धर्माधिकारी, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, नांदेड महानगराध्यक्ष जीवनराव घोगरे, सौ. प्रणिताताई देवरे-चिखलीकर, ॲड. संदीप पाटील चिखलीकर, प्रवीण पाटील चिखलीकर, सचिन पाटील चिखलीकर, डॉ. विक्रम देशमुख, चित्राताई लुंगारे, अनुसयाताई केंद्रे, कल्याण सावकार सूर्यवंशी, डॉ. उत्तमराव सोनकांबळे, कन्हैया कदम, साहेबराव धनगे, गणेशराव पाटील सावळे, अशोकराव पाटील सुगावकर, विनायकराव पाटील शिंदे मांजरमकर, ॲड. मुक्तेश्वर धोंडगे, अशोक पाटील भोगावकर, माधव पावडे, नेताजी भोसले, पप्पू जाधव, सुनंदाताई जोगदंड, सुरेखाताई पाटील, जयश्री पाटील, रोहिणीताई कुलकर्णी, सुनील नानवटे, ॲड. संघरत्न गायकवाड, मोहसीन खान पठाण, सुरेश राठोड, प्रल्हादराव उमाटे, बाबुराव पाटील कदम, अनिकेत पाटील राजूरकर, पंकज देशमुख, संतोष नारलावार, साहेबराव काळे, उपविभागीय अधिकारी अश्विनी जगताप, शिक्षण अधिकारी सविता बिरगे, कंधारचे तहसीलदार गोरे, लोहा तहसीलदार परळीकर, गटविकास अधिकारी महेश पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मिसाळ, लोहाचे गटविकास अधिकारी आडेराघू, कैलास गोरठेकर, बबन बारसे, सुहास पाटील डोंगरगावकर, संजय अंभोरे, शैलेश कऱ्हाळे, आनंदराव पाटील शिंदे, गुरुद्वारा बोर्डाचे माजी सदस्य गुरमीत सिंग महाजन, भार्गेंद्रसिंघ खडीसाज, गुरुप्रीतसिंघ सुखी, सुरेश लोट, सुधाकरराव कौशल्य, दत्ता वाले, निवृत्ती कौशल्य यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिकांनी शांतीदूत गोविंदराव पाटील चिखलीकर यांच्या समाधीचे दर्शन घेऊन अभिवादन केले.

## तातेराव शिंदे यांचे निधन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– गोपाळचावडी



ग्रामपंचायतचे माजी सरपंच तातेराव बापूराव पाटील शिंदे यांचे गुरुवार, दि. ८ मे रोजी सकाळी ६ वाजता गोपाळचावडी येथील निवासस्थानी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ६८ वर्षे होते.

त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सून-जावाई, नातू, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर सायंकाळी ७ वाजता गोपाळचावडी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी परिवारातील सदस्य यांच्यासह सामाजिक, राजकीय शैक्षणिक क्षेत्रातील अनेकांची उपस्थिती होती.

## १५ ते ३० मे कालावधीत विविध खेळांचे उन्हाळी प्रशिक्षण शिबीर

**नांदेड(प्रतिनिधी)**–क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड व नांदेड जिल्हा एकविध खेळ संघटना यांचे संयुक्त विद्यमाने विविध खेळांचे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीर आयोजित केले. १५ ते ३० मे २०२५ या कालावधीत सकाळी ६ ते सायं. ८ व सायं. ५.३० ते ७.३० या वेळेत जिल्ह्यातील विविध स्थळी प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात येणार आहे.

तरी एकविध खेळ संघटनेचे पदाधिकारी, क्लब, अकादमी व क्रीडा प्रशिक्षक, मार्गदर्शक यांनी ज्या खेळांचे प्रशिक्षण शिबीर आपण घेणार आहात त्या खेळांचे नाव व प्रशिक्षण स्थळ तसेच प्रशिक्षणाची वेळ सकाळ व संध्याकाळ नमूद करुन तसे लेखी पत्राद्वारे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे कळवावे.

या प्रशिक्षण शिबिरादरम्यान जे प्रशिक्षणार्थी सहभागी होऊ इच्छितात त्यांनी आपले नाव व खेळ बाब नमूद करावी व तसे फॉरमॅट फॉर्म जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात उपलब्ध राहील.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्ह्यातील एकविध खेळ संघटना, क्लब व अकादमी यांच्यामार्फत वरील कालावधीत संपन्न होणाऱ्या उन्हाळी मोफत क्रीडा प्रशिक्षण शिबिरास सहभागी होणाऱ्या सर्व प्रशिक्षणार्थींना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेडच्यावतीने वरील कालावधीचे सहभागी प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यात येतील.

तरी नांदेड जिल्ह्यातील एकविध खेळ संघटना, क्लब व अकादमी यांनी त्यांच्या स्तरावरुन उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराच्या संदर्भाने अवगत करुन जास्तीत जास्त नांदेड जिल्ह्यातील खेळाडुंना सहभागी करुन उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीर यशस्वी करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी पेन्शन अदालतीचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी मे महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी १३ मे रोजी सकाळी ११ ते १.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

सेवानिवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी यांनी अडचणी निवारण्यासाठी पेन्शन अदालतीच्या दिवशी उपस्थितीत राहून तक्रारीचे निवेदन द्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी नांदेड यांनी केले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com